मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

# दैनिक युवक आधार मराठी

तरुणांचा बुलंद आवाज

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १५९ ■ सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## प्रधानमंत्री मोदींकडून महाराष्ट्रासह चार राज्यांना रेल्वे प्रकल्पांची भेट; १८,५०९ कोटींच्या खर्चाला मंजुरी

**नवी दिल्ली :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने भारतीय रेल्वेच्या पायाभूत सुविधांना बळकटी देणाऱ्या तीन महत्त्वाच्या बहुमार्गी प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्र, दिल्ली, हरियाणा आणि कर्नाटक या चार राज्यांतील १२ जिल्ह्यांमध्ये रेल्वेचे जाळे विस्तारणार असून, एकूण ३८९ किलोमीटरची भर पडणार आहे. १८,५०९ कोटी रुपये अंदाजे खर्च असलेले हे प्रकल्प २०३०-३१ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.



यामध्ये महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाच्या अशा कसारा – मनमाड दरम्यानच्या ३ या आणि ४ थ्या रेल्वे मार्गाचा समावेश आहे. यासोबतच दिल्ली – अंबाला आणि बल्लारी – होस्पेट या मार्गांवरही ३ रा आणि ४ था मार्ग उभारला जाणार आहे. या वाढीव रेल्वे क्षमतेमुळे वाहतुकीतील कोंडी कमी होऊन रेल्वे सेवेची विश्वासार्हता आणि कार्यक्षमता वाढणार आहे. पीएम गती शक्ती राष्ट्रीय बृहद् आराखड्यानुसार या प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले असून, यामुळे मालवाहतूक आणि प्रवासी दळणवळण अधिक सुलभ होईल.

या प्रकल्पाचा सर्वाधिक फायदा ग्रामीण भागाला होणार असून, सुमारे ९७ लाख लोकसंख्या असलेल्या ३,९०२ गावांची संपर्क व्यवस्था सुधारणार आहे. विशेषतः महाराष्ट्रातील त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग, भावली धरण, श्री घाटणदेवी यांसारख्या पर्यटन आणि धार्मिक स्थळांकडे जाणारा प्रवास आता अधिक सोयीचा होईल. तसेच कोळसा, पोलाद, लोह खनिज, सिमेंट आणि धान्यासारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीसाठी हे मार्ग कळीचे ठरणार आहेत, ज्यामुळे प्रतिवर्ष ९६ दशलक्ष टन अतिरिक्त मालवाहतूक शक्य होईल.

पर्यावरणाच्या दृष्टीनेही हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. रेल्वे हा वाहतुकीचा पर्यावरणपूरक पर्याय असल्याने, या प्रकल्पामुळे २२ कोटी लिटर इंधन आयातीची बचत होईल आणि १११ कोटी किलोग्रॅम कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन कमी होईल, जे सुमारे ४ कोटी झाडे लावण्याइतके प्रभावी ठरेल. याशिवाय, बांधकामाच्या काळात सुमारे २६५ लाख मनुष्यबळ दिवस इतकी मोठी रोजगार निर्मिती होणार असल्याने स्थानिकांना स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील.

## पिलीव येथील कर्मवीर विद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांची राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

**दैनिक युवक आधार**

**माळशिरस तालुका प्रतिनिधी(रघुनाथ देवकर)** :माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कै रमेश खलिपे कनिष्ठ महाविद्यालयातील पाच विद्यार्थ्यांची राष्ट्रीय पातळीवरील क्रिकेट स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. नाशिक येथे झालेल्या १४ वर्षांखालील विद्यालयीन क्रिकेट खेळाडूंच्या राज्यस्तरीय स्पर्धेत सोलापूर जिल्ह्याच्या वतीने प्रतिनिधित्व करत पिलीवच्या पाच सुपुत्रांनी सोलापूर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करत सोलापूर जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे प्रमुख प्रशिक्षक एल. बी. गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तृतीय क्रमांकाचे पारितोषिकही पटकावले.



कॅप्टन दर्शन सचिन भालेराव, व्हाईस कॅप्टन आदिल अब्दुलरहीम यळसंगीकर, जय तानाजी लोखंडे,आदित्य अमोल कदम, आदर्श संतोष बगाडे हे खेळाडू प्रशिक्षक एल. बी. गोरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली एल. बी. स्पोर्ट्स शॉप, पिलीव क्रिकेट क्लब येथे सराव करीत असतात.२४ जिल्ह्यांचे संघ सहभागी असतानाही सोलापूर जिल्ह्याला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवून त्यांनी दैदिप्यमान यश प्राप्त केले.

या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य अशोक बागल, पर्यवेक्षक रमेश किरगत, क्रीडा शिक्षक भंडारे व सर्वच शिक्षक आणि शिक्षकेतर स्टाफ तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य,पिलीव परिसरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर व ग्रामस्थांकडून या विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.



**केंद्रीय गृह मंत्रालयाकडून उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रदान करण्यात येणारे "केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक" हे अत्यंत मानाचे व प्रतिष्ठेचे सन्मानचिन्ह आहे. राष्ट्रीय तपास संस्था (NIA) येथे पोलिस अप्पर अधीक्षक पदावर कार्यरत असताना श्री.बजरंग बनसोडे यांना हा सन्मान प्राप्त झाला ही आपल्या आष्टी तालुक्या साठी अभिमानाची बाब आहे.त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा सत्कार करताना आष्टी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मा.आ.भीमरावजी धोंडे साहेब यांच्या हस्ते बजरंग ( आण्णा ) बनसोडे यांच्या जन्म गावी सत्कार करून सन्मान करण्यात आला यावेळी उपस्थित श्री. विठ्ठल आण्णा बनसोडे, सरपंच तात्यासाहेब नालकोल, बबनराव औटे,माजी सरपंच काकासाहेब नालकोल,उपसरपंच विष्णू मांढरे,माणिक नालकोल,पिटू देवा,शेखर साबळे,पत्रकार मारुती सत्रे,व ग्रामस्थ रुई नालकोल**

**( दैनिक युवक आधार / बीड आष्टी प्रतिनिधी / मारुती सत्रे)**

## टाकळी विंचूरमध्ये खळबळजनक घटना! विद्यमान ग्रामपंचायत सदस्य केशव जाधव बेपत्ता

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी** : टाकळी विंचूर येथील ४५ वर्षीय विद्यमान ग्रामपंचायत सदस्य केशव यशवंत जाधव हे दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ८ वाजता घरातून कामानिमित्त बाहेर पडले आणि त्यानंतर परतलेच नाहीत. तब्बल आठ दिवस उलटूनही त्यांचा कोणताही ठावठिकाणा लागलेला नसल्याने कुटुंबीयांमध्ये तीव्र चिंतेचे वातावरण असून परिसरात खळबळ उडाली आहे.

केशव जाधव यांनी लासलगाव गटातून जिल्हा परिषद उमेदवारीची तयारी सुरू केली होती. राजकीय व सामाजिक कार्यात ते अग्रेसर म्हणून ओळखले जात होते. गावातील विविध सामाजिक उपक्रम, सार्वजनिक प्रश्न व स्थानिक घडामोडींमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. सर्वसामान्य नागरिकांमध्ये त्यांचा मोठा संपर्क व वावर होता. टाकळी विंचूर येथे 'के के सुपर मार्केट' नावाने त्यांचे किराणा दुकानही सुरू असून रोजच्या व्यवहारात सक्रिय असलेली व्यक्ती अचानक बेपत्ता झाल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

तक्रारदार कविता केशव जाधव यांच्या माहितीनुसार, संबंधित दिवशी ते कामानिमित्त बाहेर जात असल्याचे सांगून घरातून निघाले. त्यानंतर मोबाईलवर संपर्क होत नसल्याने नातेवाईक, मित्रपरिवार व ओळखीच्या ठिकाणी शोध घेण्यात आला. मात्र कोणतीही ठोस माहिती न मिळाल्याने दिनांक १३ फेब्रुवारी रोजी लासलगाव पोलीस ठाण्यात मिसिंग क्रमांक ०९/२०२६ अशी नोंद करण्यात आली आहे.



केशव जाधव यांची उंची अंदाजे ५ फूट ५ इंच, शरीरयष्टी मध्यम, रंग सावळा, चेहरा गोल, वाढलेली दाढी अशी ओळख आहे. ते घरातून निघताना पांढरा हाफ शर्ट, पांढरी पॅंट व काळे शूज परिधान केले होते. त्यांच्या जवळ अँड्रॉईड मोबाईलही असल्याची माहिती आहे.

दरम्यान, संबंधित व्यक्तीबाबत कोणालाही माहिती मिळाल्यास तात्काळ लासलगाव पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सदर प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदीप निचळ करत असून विविध ठिकाणी चौकशी व शोधमोहीम राबविण्यात येत आहे.

## रायगडचा खरा डॉन महेंद्रशेठ घरत : श्रीरंग बर्गे

### रायगडमध्ये आम्ही शान राखली : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** "रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत सत्तेचा व पैशांचा प्रचंड वापर करणाऱ्या महायुतीच्या झंझावातासमोर भलेभले धाराशाही झाले असताना काँग्रेसने लढलेल्या ३ पैकी २ जागा जिल्हा परिषदेवर प्रचंड बहुमताने जिंकून काँग्रेसचा झेंडा फडकविला. त्यामुळे जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत हेच खरे डॉन आहेत. कॉंग्रेसमध्ये मंत्री, आमदार, खासदार झाल्यानंतर अनेकांनी कॉंग्रेसलाच सोडचिठ्ठी दिली; परंतु कॉंग्रेसशी निष्ठावंत राहून महेंद्रशेठ रायगडची खिंड लढवत आहेत, हे निश्चितच कौतुकास्पद आहे," असे प्रतिपादन श्रीरंग बर्गे यांनी अलिबाग येथे केले. ते 'अलिशान कप'च्या उदघाटनप्रसंगी अलिबाग-सोगाव येथे बोलत होते. ते पुढे म्हणाले, "महाविकास आघाडीचे नेतृत्व करताना आपल्या चाणक्य नीतीने ऐनवेळी भावना घाणेकर यांना उमेदवारी जाहीर करून उरणचे आमदार महेश बालदी यांना 'पळता भूई थोडी केली' व उरण नगर परिषदेवर महाविकास आघाडीच्या माध्यमातून महेश बालदी यांच्यावर मात करत त्यांची घमेंड उतरविली. तसेच पंचायत समिती,



जिल्हा परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीची मोट बांधत स्वतः माघार घेऊन कॉंग्रेसच्या वाट्याच्या तीन जागा शिवसेना, शेकापला सोडून पुढची रणनीती आखली. उरण मतदारसंघाचा ट्रेंड ठरविणाऱ्या उरण पंचायत समितीवर ७.१ असे घवघवीत यश संपादन करून महाविकास आघाडीचा झेंडा फडकविला. त्यामुळे महेंद्रशेठ घरत यांनी २०२९ ची आमदार महेश बालदी यांची वाट बिकट केली आहे, किंबहुना विधानसभा जिंकण्याचा मार्ग मोकळा केला आहे. चिरनेर, जासई जि. प. मतदारसंघात तरुण तडफदार उमेदवारांना उमेदवारी देऊन युवकांना प्राधान्य देणे क्रमप्राप्त आहे, हे तरुणाईला दाखवून दिले."

रायगडमध्ये कॉंग्रेसने जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत तीन जागा लढविल्या आणि दोन जागा जिंकल्या. रायगड हा मतदारसंघ दिवंगत माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले आणि दिवंगत आमदार मधुकर ठाकूर यांचा आहे. राज्यात अनेक जिल्ह्यांत काँग्रेसची पीछेहाट झाली आहे, अशावेळी रायगडमधील यश निश्चितच वाखाणण्याजोगे आहे. त्यामुळे रायगडमध्ये आम्ही काँग्रेसची शान राखली, असे अभिमानाने म्हणू शकतो," असे काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत अलिबाग-सोगाव येथे म्हणाले. त्यांच्या हस्ते प्रकाश झोतात आयोजित केलेल्या 'अलिशान कप'चे उदघाटन झोकात झाले. अखंडपणे सोगावमध्ये सलग १३ वर्षे क्रिकेट सामने भरवून येथील तरुणांनी आपल्यातली जिद्द दाखविली आहे. यावेळी ते पुढे म्हणाले, "क्रिकेटचा मी चाहता आहे. मी फक्त क्रिकेट सामन्यांचे उद्धाटन करत नाही, तर गावोगावी मैदाने मिळवून देतोय, अलिबागमध्ये मधुशेठ ठाकूर यांच्या नावाने हक्काचे मैदान हवे. राजाभाऊ ठाकूर यांच्या पराभवामुळे आमचा 'गड आला, पण सिंह गेला' असे मला वाटते. बॅरिस्टर अंतुले साहेब यांच्या विचारांची कास धरून रायगड आपल्याला पुन्हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला आहे, हे दाखवून द्यायचे आहे. त्यासाठी राजाभाऊ ठाकूर यांनी आतापासूनच पुढची तयारी सुरू करावी."

राजाभाऊ ठाकूर म्हणाले, "मी खचलेलो नाही, मॅच फिक्सिंग झाली. फिल्डिंगमध्ये कमी पडलो, परंतु मी शेवटपर्यंत लढणारच आहे. ठाकूर घराण्याची मान उंचावणारच."

सुनील थळे म्हणाले, "हार-जित होते, शिस्तप्रियता हवी, येत्या काळात राजाभाऊ निश्चितच त्यांचा करिष्मा दाखवतील."यावेळी एसटी कॉंग्रेसचे श्रीरंग बर्गे, काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, राजाभाऊ ठाकूर, ॲड. प्रवीण ठाकूर, सुनील थळे, रवींद्र ठाकूर, ॲड. उमेश ठाकूर, नगरसेवक समीर ठाकूर, माजी सरपंच जगन्नाथ पेडवी, माजी उपसरपंच अशोक नाईक, अनिल जाधव, विलास गायकवाड, अनिता शिंदे, सानिका घाडी आदी उपस्थित होते. यावेळी अवघ्या पाच वर्षांच्या शिवांश याने लाठीकाठी स्पर्धेची चमक प्रेक्षकांसमोर दाखवून क्रीडाप्रेमींची मने जिंकली.

त्याची इंडोनेशिया येथे लाठीकाठी स्पर्धेसाठी निवड झाल्याने, तसेच ९१ वर्षांच्या कुतुबुद्दीन कप्तान यांचा सत्कार महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते करण्यात आला.

## सणसर गावात पालखी महामार्ग ड्रेनेजचे काम निकृष्ट –श्वसनाच्या त्रासाने ग्रामस्थांचे हाल

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** सणसर (ता.इंदापूर ) येथे पालखी महामार्गावर सुरू असलेले ड्रेनेजचे काम अपूर्ण राहिल्यामुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.काम अर्धवट सोडल्यामुळे रस्त्याच्या शेजारी राहणारे ग्रामस्थ यांच्या घरासमोर पाणी साचत असून चिखल व दुर्गंधी युक्त निर्माण झाली असून यामुळे ग्रामस्थ विद्यार्थी तसेच रोजंदारी करणारे नागरिक यांचे आरोग्य धोक्यात येत असून ग्रामस्थांना श्वसनाचा त्रास वाढला असल्याचे रुग्ण संख्या वाढलेली दिसत आहे.सणसर गावातील ग्रामस्थांना वाहतुकीसाठी सुद्धा मोठा त्रास होत आहे.

ग्रामस्थांनी सांगितले की,अपूर्ण कामामुळे



पावसाळ्यात परिस्थिती अधिक बिकट होणार असून रस्त्याच्या बाजूला पाणी साचल्याने लहान मुले अपघातात दोन वेळा वाचविण्यात आली आहेत.अनेक वेळा प्रशासनाकडे ग्रामस्थ व ग्रामपंचायत यांनी तक्रार करूनही काम पूर्ण झालेले नाही.

## पोलीस पाटील कुणाल लोंढे यांची महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या सहसचिवपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्य तसेच पालघर जिल्हा कार्यकारिणी नियुक्ती सनद बहाल कार्यक्रम आयोजन करण्यात आले. यावेळी कुणाल अशोक लोंढे यांना महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या सह सचिव पदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी बाळासाहेब शिंदे पाटील (राज्याध्यक्ष- महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ), निळकंठ थोरात पाटील (खजिनदार- महाराष्ट्र



राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ), विजय भुजंग पाटील (कार्याध्यक्ष- महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ. ) विकास पाटील (जिल्हाध्यक्ष - रायगड जिल्हा पोलीस पाटील संघ) मिलिंद पोपेटा (माजी अध्यक्ष - पनवेल तालुका पो.पा. संघ ) प्रमोद नाईक पाटील (अध्यक्ष - पनवेल तालुका पो.पा. संघ) संतोष गायकर पाटील (अध्यक्ष - नवीमुंबई पो.पा.संघ) विजय खुटले -पाटील कार्यकारणी सदस्य - रायगड जिल्हा पो.पा.संघ) राजेश पाटील (सदस्य -अलिबाग तालुका पो.पा. संघ ) आदि मान्यवर उपस्थित होते.

# सोयगावातील शिव महापुराण कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## महाशिवरात्रीनिमित्त भक्तिमय वातावरणात मान्यवरांची उपस्थिती

**दैनिक.युवक आधार**

**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे :** सोयगाव येथे सुरू असलेल्या शिव महापुराण कथेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून परिसरात सध्या भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.या कथेला शिवसेना उपजिल्हा प्रमुख प्रभाकर आबासाहेब काळे यांनी भेट देत कथाकार ह.भ.प.अनिल महाराज तुपे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

ह.भ.प.अनिल महाराज तुपे यांच्या प्रभावी आणि ओजस्वी निरूपणामुळे दररोज मोठ्या संख्येने भाविक कथा श्रवणासाठी उपस्थित राहत आहेत. भगवान शंकराच्या महिम्याचे सखोल विवेचन,जीवनातील नैतिक मूल्ये आणि धर्मसंस्कारांचे महत्त्व यावर ते मार्गदर्शन करत असून श्रोते मंत्रमुग्ध होत आहेत.

या प्रसंगी नगरसेवक संतोष बोडखे,बंटी काळे,राजू दुतोंडे,किशोर मापारी,संदीप चौधरी,अमोल मापारी,दादू काळे,रमेश गव्हान्डे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक विजय भाऊ आहिरे यांनी सर्व मान्यवरांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार केला.




सोयगाव शहरासह परिसरातील गावांमधूनही भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत असून कथास्थळी दररोज लक्षणीय गर्दी होत आहे. "हर हर महादेव"च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून जात आहे.आयोजक विजय भाऊ आहिरे यांनी उपस्थित सर्व भाविक भक्तांचे मनःपूर्वक आभार मानले व महाशिवरात्रीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.शिव महापुराण कथा ही केवळ धार्मिक सोहळा नसून समाजप्रबोधन आणि संस्कार संवर्धनाचे प्रभावी माध्यम ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

शिवसेना उपजिल्हा प्रमुख प्रभाकर आबासाहेब काळे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले—"सोयगाव येथे सुरू असलेली शिव महापुराण कथा ही श्रद्धा, संस्कार आणि समाजप्रबोधनाचे सुंदर व्यासपीठ आहे.कथाकार ह.भ.प.अनिल महाराज तुपे यांचे निरूपण अत्यंत प्रभावी व मार्गदर्शक आहे.

# केळवणे येथे राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेचे भव्य आयोजन

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर** : महाराष्ट्र हे अनेक कलागुणांनी संपन्न असे महान राज्य ...आणि ते कलागुण जास्तीतजास्त संपन्न व्हावे त्यासाठी अनेक गावांतील संस्था किंवा ग्रुप प्रयत्नशील असतात... हे सुद्धा एक प्रकारचे समाजकार्यच आहे...

अशाच प्रकारचे शिवरायांच्या भूमीतील केळवणे गाव येथील एक स्वरगंध ग्रुप नेहमी प्रयत्नशील असते... त्यांच्या याच प्रयत्नाने शनिवार १४ फेब्रुवारी या दिवशी केळवणे गावच्या बस स्थानकाच्या प्रशस्त जागेवर राज्यस्तरीय भव्य नृत्य स्पर्धा आयोजित केली होती,जेणेकरून प्रत्येक नृत्य कला असणाऱ्या




कलाकाराला त्यांच्या कलेसाठी चालना मिळेल आणि त्याच्या मुक्त केलेला एक संधी मिळून आत्मविश्वास वाढून पुढील वाटचालीस नवी उर्जा मिळेल अशी स्वरगंधा ग्रुपची प्रामाणिक संकल्पना आहे...

त्यासाठी त्यांनी राज्यातील प्रत्येक कलाकाराला संधी मिळावी म्हणून ग्रुप डान्स व सोलो डान्स साठी तब्बल ५० हजारापर्यंत बक्षीसे ठेवली होती...या कार्यक्रमात अनेक नृत्य कलाकारांनी उपस्थिती दाखवली...केळवणे गावात गेल्या कित्येक वर्षांत प्रथमच असा भव्यदिव्य आणि मोठ्या स्वरूपात राज्यस्तरीय कार्यक्रम सुव्यवस्थित पार पडला त्याचे सारे श्रेय स्वरगंध ग्रुपला आणि केळवणे ग्रामस्थांना जाते...

विशेष म्हणजे .केळवणे गावातील रहिवासी साहित्यिक/ पत्रकार अजय गणेश शिवकर आणि जिल्हा परिषद शिक्षक मा. श्री . कुमार हसुराम पाटील या दोन्ही सत्कार्मुर्तींचा विशेष सन्मान करण्यात आला... या स्पर्धेत ग्रुप डान्स विजेता पहिला क्रमांक एक्सपारमेम्ट गृप -वसई ग्रुप डान्स द्वितीय क्रमांक स्टेप आर्ट ग्रुप- उरणग्रुप डान्स तृतीय क्रमांकाचा मानकरी लोकल स्कॉड ग्रुप-कल्याण सोलो डान्स प्रथम विजेता प्रदीप गुप्ता--नवी मुंबईद्वितीय क्रमांकाचे मानकरी प्रतीक शेंदाने.. पुणेतृतीय क्रमांकाचा मानकरी.. किसन अहुजा-ठाणे सर्व विजेत्या स्पर्धकांना बक्षीस आणि स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र दिले तर..प्रत्येक सहभागी स्पर्धकास प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले...हा कार्यक्रम संपन्न होण्यासाठी संपूर्ण स्वरगंध टीम यांनी विशेष आणि अथक मेहनत घेतली तर dj sam आणि सोनिक ठाकूर यांनी विशेष महत्त्वाचे सहकार्य केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माननीय श्री जयदास ठाकूर वेश्वी यांनी केले..कार्यक्रम संपन्न होण्यासाठी परिक्षक प्रतीक पवनवेलकर ,संकेत जस्वाल सर्व पक्षीय नेते ,पदाधिकारी ग्रामपंचायत सर्व ग्रामस्थ व तरुणवर्गाने महत्त्वाचे सहकार्य करून योगदान दिले...

# सपकाळांच्या विधानाचा निषेध; धर्माबादमध्ये भाजपकडून फोटो दहन आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी/गिरमाजी सुर्यकार** : हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानबाबत केलेल्या कथित आक्षेपार्ह विधानाच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टी, धर्माबादच्या वतीने आज पानसरे चौक येथे जोरदार आंदोलन करण्यात आले. या विधानामुळे महाराष्ट्रातील शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्याचा आरोप करत कार्यकर्त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

आंदोलनादरम्यान भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी छत्रपतींच्या जयघोषात घोषणाबाजी करत सपकाळ यांच्या विधानाचा निषेध नोंदविला. "छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान सहन केला जाणार नाही", "शिवप्रेमींच्या भावना दुखावणाऱ्यांनी माफी मागावी" अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

कार्यकर्त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या छत्रपती शिवाजी



महाराज यांच्याबाबत कोणत्याही प्रकारचे अवमानकारक वक्तव्य सहन केले जाणार नाही. सपकाळ यांनी तत्काळ आपले विधान मागे घेऊन शिवप्रेमींची माफी मागावी, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

या आंदोलनात भाजपा धर्माबाद शहराध्यक्ष चक्रेश पाटील, स्थानिक पदाधिकारी, युवा कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने शिवप्रेमी उपस्थित होते. पोलिस बंदोबस्तात आंदोलन शांततेत पार पडले. दरम्यान, या प्रकरणामुळे धर्माबादसह राज्यभरात राजकीय वातावरण तापले असून पुढील काही दिवसांत या मुद्द्यावरून राजकीय वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# भारज खुर्द येथील आपले सरकार सेवा केंद्र जळून 5 लाखावर नुकसान; अपंग बांधव यांच्या वर उपासमारीची वेळ

**दैनिक युवक आधार**

**वरूड सर्कल प्रतिनिधी/ज्ञानेश्वर कुंनिकाळजे** : जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज खुर्द येथील आपले सरकार सेवा केंद्र संचालक श्री शेषराव दांडगे यांच्या मालकीचे सीएससी सेंटर शनिवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागून जवळपास पाच लाखाच्या वर साहित्य जळून खाक झाले आहे यामुळे सदर अपंग बांधवांवर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे



याबाबत अधिक सविस्तर वृत्त असे की जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज खुर्द येथील आपले सरकार सेवा केंद्र येथीलच अपंग बांधव संचालक श्री शेषराव दांडगे हे चालवत होते शनिवारी सकाळी 8 च्या सुमारास अचानक आग लागली लागलेली आग तिचा भडका एवढा भयंकर होता की संपूर्ण सीएससी सेंटर मध्ये पूर्ण कागदपत्र प्रस्ताव ऑनलाइन डॉक्युमेंट झेरॉक्स फोटो प्रिंटर सीसीटीव्ही कॅमेरे हे सर्व एक तासांमध्ये राख झाली यावेळी मोठ्या संख्येत लोक जमले होते अनेकांनी हातपंपाद्वारे पाणी उपसून त्या आगीवर टाकून आग विझवण्याचा प्रयत्न केला परंतु आपले सरकार सेवा केंद्रामधील संपूर्ण साहित्य आगी मध्ये भस्म सात झाले होते यामध्ये संपूर्ण साहित्य तर जळून खाक झालेच परंतु काही बचत गटाचे नगदी रोख जवळपास 50000 पर्यंत रक्कम सुद्धा जळून खाक झाले आहे यावेळी प्रतिनिधीशी बोलताना श्री शेषराव दांडगे यांनी सांगितले की शनिवारी सकाळी लागलेली आगी चे कारण स्पष्ट झाले नसले तरी यामध्ये आपले सरकार सेवा केंद्राचे झेरॉक्स प्रिंटर फोटो प्रिंटर लॅमिनेशन मशीन कलर मशीन सर्वच प्रकारचे साहित्य जळून खाक झाले असून ऑनलाईन प्रस्ताव असेल ठिबक सिंचन बँकेचे ऑनलाईन कामे असेल सर्व जळून खाक झाल्यामुळे माझे हित चिंतक ग्राहक यांनी या कामे उभारी घेण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे कारण या आगी मध्ये अनेक महत्त्वाचे कागदपत्रे साहित्य जळून खात झाले असल्याने नवनियम अनेक कामे प्रस्ताव तयार करण्यासाठी बराच वेळ लागणार आहे त्यामुळे आपल्या सहकार्याची आम्हाला अपेक्षा आहे दरम्यान या आगीचा पंचनामा करण्यात आले असून वरिष्ठ पातळीवर चौकशी होणार असल्याचे कळाले असे असले तरी अपंग बांधवावर झालेल्या नुकसानीमुळे उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे हे मात्र नक्की

# जिल्हाभरातील हिंगोली Jio नेटवर्क सेवा बंद – नागरिक त्रस्त, कामे ठप्प..!

**दैनिक युवक आधार**

**गजानन पवार पाटील/वासीम :** गेल्या दोन दिवसांपासून कर्मचाऱ्यांच्या संपामुळे Reliance Jio ची नेटवर्क सेवा संपूर्ण हिंगोली जिल्हाभरात बंद आहे. यामुळे नागरिकांचे प्रचंड हाल होत असून दैनंदिन जीवनावर त्याचा गंभीर परिणाम झाला आहे या पार्श्वभूमीवर jio सेंटर हिंगोली ला भेट दिली.

इंटरनेट सेवा पूर्णपणे खंडित असल्यामुळे शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी कामे ठप्प झाली आहेत. ऑनलाईन व्यवहार, शैक्षणिक कामे, व्यवसायिक देवाण-घेवाण, बँकिंग सेवा यावर मोठा परिणाम झाला आहे. इतकेच नव्हे तर नेटवर्क नसल्यामुळे कॉल देखील लागत नाहीत, त्यामुळे आपत्कालीन संपर्क साधणेही कठीण झाले आहे.जिल्ह्यातील लाखो ग्राहक मानसिक व आर्थिक त्रास सहन करत आहेत. सेवा खंडित होणे ही अत्यंत गंभीर बाब असून यावर तत्काळ तोडगा काढणे कंपनीची जबाबदारी आहे. त्यामुळे आमची ठाम मागणी आहे की,नेटवर्क सेवा तात्काळ पूर्ववत करावी.

- संपावर त्वरित तोडगा काढावा.
- ग्राहकांना झालेल्या त्रासाबद्दल दिलगिरी व्यक्त करावी.

अन्यथा, आम्ही सर्व ग्राहक दुसऱ्या दूरसंचार कंपनीकडे पोर्ट करण्याचा निर्णय घेऊ.तसेच कंपनीच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या आर्थिक व मानसिक नुकसानीची भरपाईही द्यावी लागेल. खासगीकरणाचे दुष्परिणाम काय आहेत हे देशातील खाजगीकरणाचे किती गंभीर दुष्परिणाम आहेत हे आपल्याला ह्या मुजोर कंपन्यांच्या मनमानीमुळे कारभारामुळे कळते.आपला - जिल्हा परिषद सवना सर्कल गजानन कावरखे क्रांतिकारी शेतकरी संघटना मराठवाडा अध्यक्ष..

# संभाजी झनझन यांचा सत्कार करायचा होता ! श्रध्दाजंली अर्पण करावी लागते हे दुर्दैव!:- ह.भ.प.लक्ष्मण मेंगडे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** बीड तालुक्यातील मौजे साखरे बोरगांव चे भूमीपुत्र तथा बालेवाडी क्रिडासंकुल पुणे येथे कार्यरत असलेले सुवर्ण पदक विजेते क्रिडा अधिकारी (गट-ब) कै.संभाजी शिवाजीराव झनझन यांचा सत्कार करायचा होता. परंतु त्यांनाच भावपूर्ण श्रध्दाजंली अर्पण करावी लागतेय हे दुर्दैव आहे. अशी वेळ कोणावर ही येऊ नाही!अशा शब्दात बंकटस्वामी संस्थान नेकनूर चे मठाधिपती ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले. अविवाहीत तरुण तडफदार क्रिडा अधिकारी कै.संभाजी झणझण यांचे गुजरातला प्रशिक्षणासाठी जात असताना भिषण अपघाताने दुर्देवी निधन झाले. आज त्या मुळे शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी मौजे साखरे बोरगांव येथे ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा घेऊन दोन मिनीटे मौन पाळुन भावपूर्ण श्रध्दांजली ! वाहण्यात आली. या प्रसंगी प्रा.डॉ.अशोक देवगुडे




यांनी शोक व्यक्त करताना कै.संभाजी झणझण यांच्या जाण्यानी गाव, राज्य व देशाच्या क्रिडा क्षेत्राची कधी ही न भरून निघणारी हानी झाली आहे. अशा शब्दात शोक व्यक्त केला. प्रा.श्रीराम झणझण यांनी ही श्रध्दाजंली वाहताना कै.संभाजी झणझण यांच्या अनेक आठवणी सांगितल्या. या प्रसंगी माजी मुख्याध्यापक श्री.मोहन देवगुडे, माजी सरपंच श्री. बाबासाहेब देवगुडे, श्री. अविनाश जगदाळे, श्री. रविंद्र जगदाळे, श्री. सखाराम जाधव, श्री.राजेंद्र घरत, ह.भ.प.वसंत महाराज जगदाळे, शिवसंग्रामचे युवा नेते श्री.अजिंक्य जगदाफळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. शेवटी पसायदानाने शोकसभेचा समारोप करण्यात आला. या प्रसंगी पंचक्रोशीतील प्रतिष्ठीत महिला, व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. कै.संभाजी झणझण यांच्या अपघाती निधना बद्दल बालाघाट व पंचक्रोशीत लोक हळहळ व्यक्त करत आहेत.

# तिरुपती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेत येथे श्री. संत सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** या जयंतीच्या निमित्ताने कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव आदरणीय श्री. आण्णासाहेब राठोड साहेब , श्री. एकनाथ राठोड ( माजी सरपंच, वसंतनगर ) , श्री. भारत जाधव ( उपसरपंच वसंतनगर पाचेगाव) श्री राहुल चव्हाण ( माजी उपसरपंच वसंतनगर, पाचेगाव ) श्री मोतीराम राठोड ( जेष्ठ नागरिक , वसंतनगर, पाचेगाव ), श्री आबासाहेब राठोड (वसंतनगर , पाचेगाव ) हे उपस्तिथ होते , कार्यक्रमच्या



सुरवातीला थोर संत श्री सेवालाल महाराज यांच्या प्रतिमीचे पूजन करून कार्यक्रमास सुरवात झाली. या मध्ये शाळेतील मुलाने संत सेवालाल महाराज यांच्या जीवन चरित्रावर मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी विशेष मार्गदर्शन प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक आदरणीय श्री. खरसाडे सर व माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे प्रमुख आदरणीय प्राचार्य तथा मुख्याध्यापक, श्री. दाभाडे सर , तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. थापाडे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले,कार्यक्रमाचे बहादार सूत्र संचलन श्री. प्रा. दाभाडे विष्णुपंत सर ( भौतिक शास्त्र विभागप्रमुख ) यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. राऊत आर.डी सरांनी केले.

# घाटंजी तालुक्यातील मांजरीच्या जंगलात बेपत्ता वृद्धाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/ महेश पेन्दोर** : घाटंजी तालुक्यातील पाटा पांगरा ते मांजरी जंगल परिसरात एका ६० वर्षीय वृद्धाचा मृतदेह अत्यंत विदारक अवस्थेत आढळून आला आहे. श्रीराम खेत्रूजी उईके (रा. बिदडी) असे मृताचे नाव असून, ते गेल्या काही दिवसांपासून बेपत्ता असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

घटनेचा तपशील

मिळालेल्या माहितीनुसार, मांजरी गावच्या पोलीस पाटलांनी रविवारी दुपारी पारवा पोलिसांना जंगलात एक मृतदेह पडून असल्याची माहिती दिली. पोलीस पथकाने



तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह पूर्णपणे कुजलेल्या अवस्थेत होता, तसेच चेहरा आणि डोळ्यांवर अळया पडल्या होत्या.

मुलाने केली ओळख

मृतदेहाची अवस्था पाहता ओळख पटवणे कठीण होते, मात्र घटनास्थळी पोहोचलेला मृताचा मुलगा महादेव श्रीराम उईके याने वडिलांच्या अंगातील कपड्यांवरून त्यांची ओळख पटवली. श्रीराम उईके हे जंगलातून वाळलेल्या काड्या गोळा करून त्या विकण्याचा व्यवसाय करायचे. त्यांना दारूचे व्यसन असल्याचेही त्यांच्या मुलाने पोलिसांना सांगितले.

पोलीस तपास सुरू

मृतदेहाच्या बाजूला शरीरातील द्रव साचलेले दिसून आले असून, मृत्यू नेमका कशामुळे झाला याचा तपास पोलीस करत आहेत. पारवा पोलीस स्टेशनचे सहाय्यक आणि पोलीस निरीक्षक हेमंत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कायदेशीर कारवाई व तपास सुरू आहे.

# पोहरादेवीचा होणार ऐतिहासिक कायापालट !

## बंजारा समाजासाठी सरकारचा मोठा निर्णय; उद्योग-पर्यटनातून हजारो रोजगाराच्या संधी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : बंजारा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने मोठा आणि ऐतिहासिक निर्णय घेत पोहरादेवी परिसराचा श्रद्धा, संस्कृती, उद्योग आणि पर्यटन या सर्व स्तरांवर भव्य विकास आराखडा राबविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. श्री संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त आयोजित पर्यटन महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दृक्-श्राव्य संदेशाद्वारे ही महत्त्वपूर्ण घोषणा केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संत सेवालाल महाराजांनी समाजाला स्वाभिमान, सेवा आणि संस्कारांचा मार्ग दाखविला. पोहरादेवी हे बंजारा समाजाच्या श्रद्धा आणि अस्मितेचे केंद्र असून या ठिकाणाचा विकास करताना श्रद्धेचा सन्मान राखत आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. शासनाच्या माध्यमातून पर्यटन वाढीसोबत स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्यावर विशेष भर दिला जाईल.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, पोहरादेवी परिसरात पर्यटनासोबत उद्योगनिर्मितीला प्रोत्साहन दिले जाईल. त्यामुळे स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील. रस्ते, निवास व्यवस्था, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि पर्यटकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करून या भागाचा चेहरामोहरा बदलला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी महोत्सवाच्या प्रास्ताविकात सांगितले की, पोहरादेवीला राज्याच्या प्रमुख पर्यटन स्थळांमध्ये स्थान मिळवून



देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. विविध विकासकामांमुळे या परिसराचा वेगाने विकास होत आहे.

राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सांगितले की, पर्यटन महोत्सवामुळे पोहरादेवीचा नावलौकिक वाढत असून समाजाच्या सांस्कृतिक परंपरेचे जतन होत आहे.

युवा पिढीला आपल्या इतिहास आणि संस्कृतीची ओळख करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या महोत्सवातून होत आहे.

या भव्य सोहळ्यात समाजसेवा, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सात मान्यवरांना "सेवारत्न पुरस्कार" प्रदान करून गौरविण्यात आले. कार्यक्रमाला विविध मंत्री, लोकप्रतिनिधी, अधिकारी, महंत, विश्वस्त आणि हजारो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोहरादेवी येथे आयोजित या पर्यटन महोत्सवामुळे श्रद्धा, संस्कृती आणि विकासाचा संगम घडून आला असून भविष्यात हा परिसर उद्योग, पर्यटन आणि रोजगाराचे प्रमुख केंद्र म्हणून विकसित होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

**सरकारच्या विकास आराखड्यातील ठळक मुद्दे**

पोहरादेवीचा पर्यटन स्थळ म्हणून भव्य विकास

उद्योगनिर्मितीद्वारे स्थानिक युवकांना रोजगार

रस्ते, निवास व्यवस्था व मूलभूत सुविधांचा विस्तार

श्रद्धास्थानाचा सन्मान राखत आधुनिक सुविधा

बंजारा समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस :**

"बंजारा समाजाच्या विकासासाठी शासन पूर्ण ताकदीने काम करत असून पोहरादेवीचा सर्वांगीण विकास केला जाईल."

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे :**

"उद्योग आणि पर्यटनाच्या माध्यमातून पोहरादेवी परिसरात रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील."

**मंत्री संजय राठोड :**

"पोहरादेवीला राज्याच्या पर्यटन नकाशावर अग्रस्थान मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे."

**राज्यमंत्री इंद्रनील नाईक :**

"पर्यटन महोत्सवामुळे पोहरादेवीचा नावलौकिक वाढत असून सांस्कृतिक ओळख अधिक मजबूत होत आहे."

## शिवेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीचा उत्साह; दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी

**दैनिक युवक आधार -**

**जाफ्राबाद तालुका/प्रतिनिधी अशोक म्हस्के** : महाशिवरात्रीनिमित्त संपूर्ण परिसरात भक्तीचे वातावरण असून, तालुक्यातील बोरगाव मठ येथील प्राचीन आणि जागृत देवस्थान असलेल्या "ॐ शिवेश्वर महादेव" मंदिरात दर्शनासाठी भाविकांचा महासागर पाहायला मिळला. पहाटेपासूनच 'हर हर महादेव' आणि 'ॐ नमः शिवाय' च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला आहे.

महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर पहाटे मंदिराचे द्वार उघडण्यात आले. मुख्य पुजाऱ्यांच्या हस्ते महादेवाचा अभिषेक आणि पूजा संपन्न झाली. त्यानंतर मंदिर भाविकांसाठी दर्शनासाठी खुले करण्यात आले. मंदिराच्या गाभाऱ्यात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती, महादेवाची पिंड अतिशय विलोभनीय दिसत होती.

दर्शनासाठी पहाटे ३ वाजेपासूनच भाविकांनी रांगा लावल्या होत्या. सूर्योदयानंतर गर्दीत अधिकच वाढ झाली. भाविकांची संख्या इतकी



मोठी होती की, मंदिराच्या बाहेर लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या. उन्हाचा तडाखा असूनही भाविकांचा उत्साह कमी झाला नव्हता.

गर्दीचे नियोजन करण्यासाठी मंदिर ट्रस्ट आणि ग्रामस्थांकडून चोख व्यवस्था करण्यात आली होती.कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. रांगेत उभे असलेल्या भाविकांसाठी पिण्याचे पाणी आणि फराळाची व्यवस्था ॐ शिवेश्वर संस्थांच्या वतीने करण्यात आली होती."गेल्या अनेक वर्षांपासून महाशिवरात्रीलाॐ शिवेश्वर महादेवाच्या दर्शनाला भाविक येतात, पण यंदाची गर्दी अभूतपूर्व होती. देवाच्या दर्शनाने मनाला मोठी शांती मिळाली," अशी भावना एका भाविकाने व्यक्त केली.

## महाशिवरात्री यात्रा महोत्सव रुई नालकोल

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/ मारुती सत्रे :** आष्टी तालुक्यातील रुई नालकोल याठिकाणी महाशिवरात्री दरवर्षी विशेष उत्साह,भक्ती आणि भव्य आयोजनांसह साजरी केली जाते.

महाशिवरात्री हा हिंदू धर्मातील अतिशय पवित्र सण आहे, जो भगवान शिव आणि देवी पार्वती यांच्या विवाहाचा आणि शिवाची आराधना करण्याचा दिवस म्हणून साजरा केला जातो.या दिवशी भक्त येणाऱ्या अंधकारावर प्रकाश,भक्तीवर समर्पणाचे स्मरण करतात.

रुई नालकोल ठिकाणी महाशिवरात्री या दिवसापासून तीन दिवस यात्रा मोठ्या प्रमाणात भरली जाते व तीन दिवस विविध कार्यक्रम ठेवले




जातात,

**कार्यक्रमाचे रूपरेषा**

रविवार दि.15 / 02 /2026 सकाळी आठ वाजता ज्योत सोहळा, सायंकाळी 9 ते 11वाजता ह.भ.प.प्राचीताई महाराज यांचे जाहीर कीर्तन

सोमवार दि.16 / 02 / 2026 सायंकाळी 7 वाजता पालखी मिरवण व बॅन्जो, फाटक्याचे आतिषबाजी, हलगी पथक,संबळ पथक मिरवणूक

मंगळवार दि.17 /02 /2026 सकाळी 9 वाजता आनंद लोकनाट्य तमाशा शो हजर्या कार्यक्रम , दुपारी 3 वाजता जंगी कुस्त्यांचा हंगाम, सायंकाळी 7 वाजता आनंद लोकनाट्य तमाशा शो, या सर्व कार्यक्रमासाठी रुई नालकोल पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी उपस्थित राहावे असे आव्हान ग्रामपंचायत कार्यालय रुई नालकोल व ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे

## सिल्लोडमध्ये संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :-** बंजारा समाजाचे आराध्य दैवत आणि थोर समाजसुधारक जगद्गुरू संत श्री सेवालाल महाराज यांची जयंती येथील शिवसेना भवन (आमदार अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय) येथे आज उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी राज्याचे माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

"संतांनी दिलेली समता, बंधुता आणि मानवतेची शिकवण आजही समाजाला योग्य दिशा देणारी आहे," असे प्रतिपादन आ. सत्तार यांनी यावेळी केले. त्यांनी उपस्थितांशी संवाद साधून जयंतीच्या शुभेच्छाही दिल्या.

या सोहळ्याला नगराध्यक्ष अब्दुल समीर, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, जिल्हा परिषद सदस्य देविदास पालोदकर, शिवसेना पदाधिकारी केशवराव तायडे, अर्जुन गाढे, दामूअण्णा गव्हाणे, किशोर अग्रवाल, रामदास पालोदकर, शेख सलीम, शंकरराव खांडवे, मुक्ताराम पाटील, शेख रब्बानी, नगरसेवक सुधाकर गायकवाड, रउफ बागवान, बाबू शहा, प्रशांत क्षीरसागर आदींसह मतदारसंघातील कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षण क्रांतीचे नवे पाऊल!; पहिली–आठवीला मोफत बॅग योजना, १६५ कोटी खर्च

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** "योजनेचे तपशील"

या योजनेसाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, राज्यभरातील ४१ लाख ४३ हजार ५४ विद्यार्थ्यांना दर्जेदार दप्तरांचा पुरवठा केला जाणार आहे. नव्या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी सुरू होईल आणि ई-निविदा प्रक्रियेद्वारे खरेदी होईल. ज्या महापालिका किंवा नगरपालिकांनी आधीच स्वतंत्र मोफत बॅग योजना राबवली आहे, त्या शाळांना वगळण्यात येणार आहे.

**"प्रमुख उद्दिष्टे"**



पालकांवरील शालेय खर्च कमी करणे, विद्यार्थी गळती थांबवणे आणि ग्रामीण-दुर्बल घटकांना शिक्षणात टिकवणे ही योजनेची मुख्य ध्येये आहेत. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा २००९ व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या अनुषंगाने हे पाऊल उचलले गेले. आधीच मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, मध्यान्ह भोजन यांसारख्या सुविधा देत असताना दप्तराची भर पडली.

**"पालक व शिक्षकांचे मत"**

विद्यार्थ्यांमध्ये आनंदाची लहर उसळली असून, पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, गणवेश योजनेप्रमाणे विलंब होऊ नये, दप्तराची गुणवत्ता चांगली असावी आणि शैक्षणिक वर्ष सुरू होताच मिळावे, अशी मागणी पालक, शिक्षक व नागरिक करत आहेत. शिक्षण तज्ज्ञांच्या मते, लहान मुलांसाठी ही योजना उपयुक्त ठरेल आणि शाळेप्रती जिव्हाळा वाढेल.

**"अपेक्षित परिणाम"**

महागाईच्या काळात शालेय साहित्याचा बोजा हलका होईल, शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या कमी होईल आणि सरकारी शाळांची पटसंख्या वाढेल. हा निर्णय फडणवीस सरकारचा शिक्षण क्षेत्रातील मोठा उपक्रम म्हणून पाहिला जात आहे.

## दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभागातर्फे भव्य शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**रणिता ठाकूर उरण रायगड** : दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त 'शिवजन्मोत्सव २०२६' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. मागील सहा वर्षांपासून उरण तालुक्यात हा भव्य दिव्य असा एकमेव शिवजन्मोत्सव दुर्ग मावळा परिवार उरण विभाग साजरा करत आहे. दरवर्षी विशेष आकर्षणांसह विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करत आले आहेत.

यावर्षीही शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा होणार आहे,कार्यक्रमाची सुरुवात दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी गडावरील कुंडातून आणले जल कलशाचे रात्री मिरवणूक, मशाल फेरी व दीपोत्सवने होणार असून पारंपरिक पद्धतीने गडावरील कुंडातील पाण्याने विमला तलाव येथील पूर्णाकृती







शिव पुतळ्याचे शिवाभिषेक करण्यात येणार आहे. दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी आठ वाजता पूर्णाकृती पुतळ्याजवळ शिवरायांना पाळण्यात टाकले जाते आणि त्यानंत मोठा गाजा वाजा करत विमला तळाव ते किल्ले द्रोणागिरी, डाऊजरनगर ,येथे पालखी मिरवणूक व गडपूजन असे कार्यक्रम पार पडणार आहेत.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे 'शिवगर्जना शाहीर पथक' यांचे सादरीकरण असून युवाशाहीर अभिषेक पाटील व सहकाऱ्यांच्या उपस्थितीत शिवचरित्रावर आधारित प्रेरणादायी कार्यक्रम सादर केला जाणार आहे. तसेच शिवप्रेमी मित्रपरिवाराचा सहभाग यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण होतं असते.

या भव्य सोहळ्याचे आयोजन दुर्ग मावळा प्रतिष्ठान, उरण विभाग महाराष्ट्र राज्य, डाऊजरनगर ग्रामस्थ व शिवप्रेमी मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. सर्व शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवजन्मोत्सव सोहळा यशस्वी करावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. जय भवानी! जय शिवाजी!

## पांडुरंग आवटे यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी** :



म्हाळसापूर (ता. सेलू) येथील रहिवासी पांडुरंग रंगनाथराव आवटे (वय ८० वर्षे ) यांचे रविवारी (ता. १४) रात्री ११ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर म्हाळसापूर येथील वैकुंठ धाम स्मशानभूमीत रविवारी (ता. १५) सकाळी अंत्यसंस्कार संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, १ मुलगी, सून, नातू असा परिवार आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळ शाखा, सेलू येथील विमा प्रतिनिधी बालासाहेब आवटे यांचे वडील होते.

## सणसर येथील सोनारमळ्यात महाशिवरात्री निमित्त भंडाऱ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सणसर /विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर येथील सोनारमळा येथे महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त स्थानिक महादेव मंदिरात रविवारी भंडाराचे आयोजन करण्यात आले होते.सणसर गावातील सर्व कांबळे(सोनार) बंधूनी एकत्र येऊन महादेव मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला असल्यामुळे सकाळपासून भक्तांची गर्दी झाली होती




महादेव भक्तांनी मोठ्या उत्साहात अभिषेक पूजा-अर्चा केली महादेव मंदिर परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.

भंडाऱ्यात हजारो गावकरी भक्तांसाठी फराळ महाप्रसादाचे वाटप सराफ संरक्षण समिती पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मा.जगदीश कांबळे दत्तात्रय कांबळे रमेश कांबळे गणेश कांबळे बंडू कांबळे यांच्या मार्फत करण्यात आले.या कार्यक्रमात स्थानिक गावकरी जयराम महाराज शिंदे हे नित्यपूजा करत असतात गावातील युवा मंडळींनी, महिलांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला असून,सामाजिक एकतेचा सुंदर संदेश या मार्फत दिला आहे. महाशिवरात्रीच्या निमित्ताने सणसर येथील सोनार मळ्याच्या भागात महाशिवरात्री निमित्त भक्तीभाव आणि उत्साहाचे वातावरण पसरले होते.

## जाहीर निषेध

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करून तमाम शिवभक्तांच्या भावना दुखावणाऱ्या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या बेजबाबदार वक्तव्याचा तीव्र निषेध करण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा तर्फे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा महाल येथे युवा मोर्चा अध्यक्ष सचिन करारे यांच्या नेतृत्वात निषेध नोंदविण्यात आला सोबत महामंत्री रितेश पांडे,रिषभ अरखेल,कुलदीप माटे,संपर्क




महामंत्री नागेश साठवने, मध्य विधानसभा समन्वयक अथर्व त्रिवेदी,मंडल अध्यक्ष सन्नी झेंडे,केतन साठवने, सुमित शाहू,रितेश पांडे,हर्षल वाडेकर, धवल आत्राम, प्रज्वल मंगर,अनुप समुंदरे,साहिल ठाकुर, लखन धुसिया,अदिति लांजेवार व मोठ्या संख्येने युवा मोर्चाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोफत बेसिक इलेक्ट्रिक युवकांना रोजगार निर्मिती साठी प्रशिक्षण; दिलासा संस्थेचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी /महेश पेन्दोर :** चोरांबा येथील दिलासा संस्था चे प्रशिक्षण सेंटर वर नुकतेच जीविका स्किल बेस प्रकल्पाच्या अंतर्गत दिलासा संस्थेच्या माध्यमातून आणि जे.सी. फ्लावर आणि सोशल कॅपिटल इनिशेटिव्ह सहकार्यातून कळंब तालुक्यातील वीस गावातील युवकांना बेसिक इलेक्ट्रिक विषयक मोफत प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण एकूण 8 दिवसांचे निवासी स्वरूपाचे होते.दरम्यान एकवीस तरुणांनी यात सहभागी होऊन प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींना इलेक्ट्रिक कामाची मूलभूत माहिती, हाउसिंग वायरिंग, शेती पंप जोडणी तसेच प्रात्यक्षिक स्वरूपात सेफ्टी टूल्सचा वापर व थेअरी शिकविण्यात आली.



या प्रशिक्षणामुळे गावातील युवकांना आपल्या गावातच इलेक्ट्रिक काम करून स्वतःची उपजीविका चालवण्याची संधी उपलब्ध होणार आहे. यासोबतच गावातील नागरिक व शेतकऱ्यांच्या इलेक्ट्रिक संबंधित अडचणी सोडवण्याचे कामही हे युवक करू शकणार आहेत.प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर दिलासा संस्थेच्या वतीने सर्व प्रशिक्षणार्थींना प्रशस्तीपत्र (प्रमाणपत्र) आणि टूल किट देण्यात आली. प्रशिक्षण व साहित्याची मदत मिळाल्यामुळे आपण त्वरित काम सुरू करू शकतो, अशा भावना प्रशिक्षणार्थींनी व्यक्त केल्या.या प्रसंगी दिलासा संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती विजयाताई धस यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रशस्तीपत्र व टूल किटचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन स्वयंरोजगार निर्मितीस चालना मिळणार आहे,

# उद्धट गावाचा सायकलपटू विठ्ठल भोसले यांच्या कामगिरीने झाली महाराष्ट्राची ओळख

**दैनिक युवक आधार**
**सणसर /विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील उद्धट गावाचा सायकलपटू विठ्ठल भोसले याने अरुणाचलमध्ये महाराष्ट्राचा झेंडा उंचावला अनुभवी सायकलपटू विठ्ठल भोसले ठरले दिवसाचे हिरो रोईंग,लोअर दीबांग व्हॅली, अरुणाचल प्रदेश दि.१३ फेब्रुवारी रोजीच्या २२ व्या राष्ट्रीय माउंटन बाइक (MTB) स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राने दणदणीत कामगिरी करत देशभरात आपला दबदबा निर्माण केला. या यशामध्ये अनुभवी सायकलपटू विठ्ठल भोसले (पुणे) यांची भूमिका निर्णायक ठरली.कठीण डोंगराळ ट्रॅक,खिंडी आणि खडतर वळणांनी भरलेल्या आव्हानात्मक सर्किटवर भोसले यांनी आपल्या अनुभव,सहनशक्ती आणि अचूक रणनीतीच्या जोरावर महाराष्ट्राला सुवर्ण क्षण मिळवून दिला.सांघिक टाइम ट्रायलमध्ये सुवर्ण क्षण मिक्स टीम टाइम ट्रायल या अत्यंत कठीण आणि तांत्रिक प्रकारात महाराष्ट्राच्या संघाने सुवर्ण पदक पटकावत दिवस गाजवला.या संघात विठ्ठल भोसले यांच्यासह प्रणिता सोमण (अहिल्यानगर),हर्षद पाटील (कोल्हापूर) मनाली रत्नोजी (पुणे) योगेश सोनवणे व तनुजा बागुल (नाशिक) यांनी उत्कृष्ट समन्वय दाखवला.संपूर्ण ट्रॅकमध्ये संघाचे नेतृत्व भोसले यांनी शांत आणि अचूक पद्धतीने केले ज्यामुळे दबावाच्या परिस्थितीतही संघाची गती व संतुलन कायम राहिले.

अनुभवाचा ठसा डोंगराळ भागातील सायकलिंगमध्ये विठ्ठल भोसले यांचा अनुभव महाराष्ट्रासाठी मोठी ताकद ठरला.तामिळनाडू व केरळच्या मजबूत प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध खेळताना त्यांनी संघाला योग्य गती, योग्य अंतर आणि रणनीती टिकवून ठेवण्याचे मार्गदर्शन



केले.त्यांच्या नेतृत्वामुळेच महाराष्ट्राने कठीण स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले अशी भावना प्रशिक्षक व सहकाऱ्यांनी व्यक्त केली.महाराष्ट्राची दमदार कामगिरी दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राने एकूण २ सुवर्ण १ रजत आणि २ कांस्य अशी पदकांची कमाई केली. क्रॉस-कंट्री,डाउनहिल आणि सांघिक प्रकारांमध्ये देशातील २८ राज्यांतील ५०० हून अधिक सायकलपटूंमध्ये महाराष्ट्राने आपली छाप पाडली. यशामागील पाया ग्रासरूट स्तरावरील प्रशिक्षण,सातत्यपूर्ण सराव,तांत्रिक मार्गदर्शन आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचा अनुभव यामुळे हे यश शक्य झाले.विशेषतः विठ्ठल भोसले यांच्यासारख्या अनुभवी खेळाडूंमुळे नवोदित सायकलपटूंना प्रेरणा मिळत आहे.स्पर्धा १५ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार असून,आव्हानात्मक अरुणाचल ट्रॅकवर महाराष्ट्रा कडून आणखी पदकांची अपेक्षा व्यक्त होत आहे. महाराष्ट्राच्या सायकलिंग संस्कृतीला नवी ओळख मिळवून देणाऱ्या विठ्ठल भोसले यांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मुदगलेश्वर मंदिरात महाशिवरात्री निमित्त दर्शनासाठी रांगा हजारो भाविकांनी घेतले दर्शन

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** पाथरी तालुक्यातील मुदगल हे गाव तिर्थक्षेत्र म्हणून राज्य सह परराज्यात सुप्रसिद्ध आहे परराज्यांतील भाविक दोन दिवसांपासून मंदिर परिसरात आले तर मुदगल पंचक्रोशीतील श्रध्दास्थान असलेल्या पाथरी तालुक्यातील मुदगलेश्वर मंदिरमध्ये महाशिवरात्री निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते पहाटे पासून मुदगलेश्वरांस अभिषेक नाम जप भजन जय जय मुदगलेश्रर या जयघोषाने मंदिर परिसर दणाणून गेला होता.भाविकांना



दर्शन सुरुळीत घेण्यासाठी मुदगल येथील युवकांनी खुप मेहनत घेतली पहाटे चार वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत भाविकांच्या दर्शनासाठी मोठं मोठ्या रांगा लागल्या होत्या मंदिर परिसरात खाद्यपदार्थ खेळणी व पूजन साहित्यांचे स्टॉल मांडले होते मुदगल येथील ग्रामस्थांच्या वतीने सर्व भाविकांना उपवासाचे पदार्थ मोफत देण्यात आले राजे मल्हार मंडळ मुदगल येथील युवकांनी भाविकांना चाय चे मोफत वाटप करण्यात आले होते भाविकांना उन्हापासून संरक्षण व वाहने पार्किंग सुविधा करण्यात आली होती भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पाथरी पोलिस ठाण्यातील पोलिस कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते भाविकांना आरोग्य सेवेसाठी वाघाळा येथील प्राथमिक उपआरोग्य केंद्रांचे डॉक्टर यावेळी उपस्थित होते

# त्याग मुर्ती कोट्यवधी लेकरांची आई माता रमाई भिमराव आंबेडकर यांची १२८वी जयंती सिद्धार्थ नगर, मुगट येथे उत्साहात साजरी करण्यात आली

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी – प्रकाश गवारे :** सिद्धार्थ नगर, मुगट येथे कोट्यवधी लेकरांची आई, त्याग, संघर्ष आणि समर्पणाची मूर्ती असलेल्या यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त भव्य व प्रेरणादायी कार्यक्रम मोठ्या हर्षोल्हासात पार पडला. जयंतीनिमित्त संपूर्ण परिसर निळ्या झेंड्यांनी, आकर्षक फलकांनी आणि रोषणाईने सजविण्यात आला होता. जयभीमच्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. नागरिक, महिला, युवक व बालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.



कार्यक्रमाची सुरुवात सत्यजित भंतेजी यांच्या हस्ते बुद्ध वंदनेने करण्यात आली. त्यानंतर माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून माता रमाई यांच्या त्यागमय जीवनकार्याचा गौरव केला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला खंबीर साथ दिली, त्यांच्या संघर्षमय जीवनातून समाजाने प्रेरणा घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून दादाराव श्रीराम हाटकर, उपाध्यक्ष मारोती सिताराम हाटकर, कोशाध्यक्ष गंगाधर रमेश गवारे तसेच सल्लागार देवराव सोपान हाटकर आणि नारायण तुकाराम हाटकर उपस्थित होते. त्यांनी समाजात समता, बंधुता आणि शिक्षणाचा संदेश रुजविण्याचे आवाहन केले. माता रमाईंच्या आदर्शांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमात आनंद हाटकर, शंकर हाटकर, महिंद्र हाटकर, जय हाटकर, भगवान हाटकर, सचिन गवारे, प्रनव हाटकर, बोधाचार्य स्वप्नील हाटकर, भिमराव सदावर्ते, कामाजी हाटकर, वामन हाटकर यांच्यासह सर्व बोध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला व युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले. उपस्थितांसाठी भोजनदान करण्यात आले. समाजातील एकोप्याचे आणि बंधुभावाचे दर्शन घडविणारा हा जयंती सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# सुर्यनमस्कार स्पर्धेत दूरशेत येथील कविता गावंड प्रथम !

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी :** पेण येथील मनोहर हॉलमध्ये नुकत्याच पार पडलेल्या, आरोग्य भारती योगा ग्रुप तर्फे महिलांच्या खुल्या गटात सुर्यनमस्कार स्पर्धेत दूरशेत येथील कविता सचिन गावंड यांनी 201 सुर्यनमस्कार काढून प्रथम क्रमांक पटकावला. पेण नगरपरिषदेच्या विद्यमान नगराध्यक्षा प्रीतम ललित पाटील यांच्या हस्ते कविता गावंड यांना रोख 1001 रकमेचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. तर पूजा उलवे (द्वितीय) सुप्रिया पाटील (तृतीय) प्रगती म्हात्रे (चतुर्थ) सिंधू सोनावणे (पाचवा)



या स्पर्धक विजयी झाल्या.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना कविता गावंड यांनी माझा प्रथम क्रमांक आल्याबद्दल मला खुप छान वाटते. तसे पाहिल तर आम्ही सर्वजण योगा करतो. मी 2022 पासून योगा वर्गाला जाते. योगा केल्याने आपल्या डोक्यातील ताणतणाव दूर होऊन मन अगदी प्रसन्न व आनंदी होते. डॉ.अशोक भोईर हे कुठलीही फी न घेता आम्हाला योगाचे प्रशिक्षण देतात. त्यामुळे भोईर सरांना मनापासून धन्यवाद देतो.

प्रथम विजेत्या कविता गावंड या पत्रकार कैलासराजे घरत यांच्या भगिनी असून, या यशाबद्दल पत्रकार कैलासराजे घरत, आई निर्मला घरत, अण्णासाहेब घरत, ओवी घरत, मयुरी घरत, कुणाली पाटील, किर्ती देसले या सर्वांनी कविता गावंड यांचे अभिनंदन केले.

# पाचोंदा दुहेरी खून प्रकरणातील आरोपी विरोधात ॲट्रॉसिटी कलमवाढ करावी

**दैनिक युवक आधार**
**माहुर : प्रतिनिधी/सय्यद ईसा :** माहूर तालुक्यातील पाचोंदा येथील दोन दलित महिलांची हत्या करून गळ्यातील सोने लुटल्याची घटना २० नोव्हेंबर २०२५ रोजी घडली होती.या घटनेमुळे नांदेड जिल्ह्यासह संपूर्ण राज्य हदरले होते.बौध्द समाजातील अंतकला आढागळे आणि अनुसयाबाई आढागळे या सख्या दोघी जावांचा निर्घृन खून करून गळ्यातील मंगळसूत्र व इतर दागिने चोरून नेले होते. यातील दोन आरोपीना पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार १२ तासाच्या आत अटक करण्यात आली होती.

यातील एक आरोपी गजानन येरजवार हा पाचोंदा गावाजवळील गावचा रहिवासी असून त्याचे नेहमीसाठी पाचोंदा येथे येणेजाने होते. तो मयत महिलांना पूर्वीपासून ओळखत होता. असा लेखी




जवाब गावातील सरपंच विलास तोरकड व इतर प्रतिष्ठित लोकांनी पोलीस ठाणे माहूर येथे लेखी स्वरूपात ३० नोव्हेंबर रोजी दिला आहे.दोन्हीही मयत महिलांच्या मुलांनी दि. १५ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक माहूर यांना लेखी निवेदन देऊन खुनातील आरोपी विरुद्ध ॲट्रॉसिटी व मोका गुन्हा दाखल करून कलम वाढ करण्याची मागणी वेळोवेळी केली आहे.माकप सचिव कॉ.गंगाधर गायकवाड यांनी पोलीस अधीक्षक यांना प्रत्यक्षात भेटून सदरील प्रकरणी लक्ष वेधले होते व कलम वाढ करावी अशी लेखी मागणी केली होती. तेव्हा सरकारी वकिलांचे मार्गदर्शन मागवून कलम वाढ करण्यात येईल असे पोलीस अधीक्षक यांनी कळविले होते. परंतु अद्याप कलम वाढ होत नसल्याने आणि उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक माहूर कलमवाढ करण्यात उदासीन असल्यामुळे खून झालेल्या दोन्हीही महिलांच्या मुलांनी नामे नागेंद्र साहेबराव आढागळे व विकास अशोक आढागळे रा. पाचोंदा ता.माहूर यांनी १२ फेब्रुवारी पासून जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड समोर बेमुदत आमरण उपोषण सुरु केले असून त्या उपोषणास मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व डीवायएफआयच्या वतीने जाहीर पाठिंबा दिला आहे. पीडित उपोषणार्थिंच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीतर तीव्र आंदोलन छेडणार असा इशारा देखील उपरोक्त पक्ष संघटनेने दिला आहे.जिल्हाधिकारी राहुल कर्डीले व पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांनी स्वतः लक्ष घालून पीडितांना न्याय द्यावा अशी मागणी होत आहे.

# सरोजनी नायडू हिंदी काव्य का चमकता तारा.डॉ देविदास जाधव

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी/ महादेव उप्पे :** कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय हणेगाव अंतर्गत हिंदी विभागाच्या वतीने 'सरोजनी नायडू' यांच्या जन्म दिनानिमित्ताने दिनांक १३ फेब्रूवारी २०२६ ह्या रोजी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.उमाकांत बिरादार हे होते तर प्रमुख पाहुणे व अतिथी व्याख्याते म्हणून पानसरे महाविद्यालय



अर्जापूर येथील डॉ.देविदास जाधव हे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.पवन एमेकर यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु .वैशाली गिरेवाड हिने केले. अतिथी व्याख्याते डॉ. देविदास जाधव यांनी 'सरोजनी नायडू हे हिंदी साहित्यातील चमकता तारा आहे'असे संबोधले.या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कुमारी अंकिता पांचाळ यांनी केले.या कार्यक्रमास डॉ.उत्तम मानवते,डॉ.अशोक साबणे,डॉ. सूर्यकांत कळसकर डॉ.आनंद शिंदे,प्रा.शिलदेवी कांबळे,प्रा.भरत बिरादार, प्रा.वैभव जाधव,भाऊराव पवार,जयप्रकाश झमकाडे, शंकर राठोड,मारुती चव्हाण,संतोष सूर्यवाड,व्यंकट वाघमारे,प्रवीण राठोड,मसीन मचकुरी आदींची उपस्थिती होती.या कार्यक्रमासाठी संस्थेचे कार्यवाहक डॉ.चरणसिंग राठोड,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंचशील एकंबेकर यांचे मार्गदर्शन लाभले.या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद होता.

# प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाब डख यांची कलगाव येथे उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**दिग्रस प्रतिनिधी/उमेश साखरकर :** तालुक्यातील दिग्रस ते आर्णी रोडवरील वाई मेंढी फाट्या जवळ प्रगतिशील शेतकरी देवानंद पंडागळे या शेतकऱ्याच्या शेतात हरभरा पीक पाहणी कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाब डख उपस्थित होते. किशोर जाजु आणि तालुक्यातील कृषी विक्रेते आणि शेतकरी उपस्थित




होते. शेतकऱ्यांना संबोधित करतांना त्यांनी इनोवेज 81 या हरभरा पिकाविषयी माहिती सांगितली. हा हरभरा एक्यांशी दिवसात तयार होतो. चाळीस ते अड्ठेचाळीस दिवसात फुलांच्या अवस्थेत येतो. हे पीक हार्वेस्टिंग ने (यंत्राद्वारे) काढता येते .

त्यामुळे मजुरी खर्चात बचत होते. त्यानंतर त्यांनी हवामान विषयक उपस्थिताना माहिती सांगितली. यावर्षी पाऊस सरासरी असून पीक चांगले राहतील त्यानंतर त्यांनी असे सांगितले की पावसाचा अंदाज कोणाला न विचारता निसर्गच अंदाज देतो ते ओळखा आणि शेती करा. निंबाच्या झाडाचा शेंडा वाळला तर पाऊस कमी प्रमाणात पडतो. असे बरेच उदाहरणे त्यांनी दिली. वीस फेब्रुवारीपासुन ऊन वाढणार असुन आठवड्याच्या शेवट ढगाळ वातावरण निर्माण होणार आहे. असे प्रतिपादन केले. उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन आणि मोलाचा सल्ला दिला प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाब डख हे येणार असल्याने परिसरातील शेतकरी खूप मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाला अमोल बनगिनवार, विष्णु भनक, परिक्षीत पंडागळेसह आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात आधुनिक पत्रकारितेवर कार्यशाळा

**दैनिक युवक आधार**

**नांदेड | प्रतिनिधी योगेश चौदंते** : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंपर्क कार्यालय व माध्यमशास्त्र संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक पत्रकारिता या विषयावर एकदिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे आयोजन बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे, अशी माहिती कार्यशाळेचे समन्वयक व जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी दिली.

कार्यशाळेचे उद्घाटन बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.०० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात होणार आहे. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर राहणार असून प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन व कुलसचिव डॉ. जनेश्वर पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यशाळेत आधुनिक पत्रकारितेतील बदलते प्रवाह, डिजिटल पत्रकारिता, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, माध्यमांचे भविष्य आदी विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील संपादक नंदकुमार पाटील आधुनिक पत्रकारितेवर विचार मांडतील. तसेच 'न्यूज १८ मराठी'चे मुंबई येथील सहसंपादक फराज खान कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारितेचे भविष्य यावर मार्गदर्शन करतील. 'मॅक्स भूमी' चॅनलच्या संचालिका प्रियदर्शनी हिंगे डिजिटल पत्रकारितेतील संधी व आव्हाने यावर व्याख्यान देणार आहेत.

दुपारी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय संपादक संतोष शालिग्राम 'आधुनिक पत्रकारिता आणि तंत्रज्ञानाचे योगदान' या विषयावर, तर विद्यापीठाच्या अभियांत्रिकी संकुलाचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात माध्यमांमधील विद्यार्थ्यांची प्रतिमा कशी घडवावी' यावर मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यशाळेमुळे पत्रकार बांधवांना आधुनिक पत्रकारितेतील संधी, आव्हाने आणि भविष्यातील दिशा यांचे सखोल आकलन होण्यास मदत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी नवोपक्रम, नवसंशोधन व सहकार्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश बोडरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम तसेच माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. सहास पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्या गठित करण्यात आल्या असून विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# कॉपीमुक्त' अभियानाचे वाजले बारा. !

## ४४ विद्यार्थ्यांसह १८ कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार

## जिल्हाधिकाऱ्यांच्या धडक मोहिमेने शिक्षण क्षेत्रात खळबळ

**दैनिक युवक आधार**

**वाशिम /गजानन पवार पाटील** : राज्यात बारावीच्या (H.S.C.) परीक्षा सुरू असताना वाशिम जिल्ह्यात सामूहिक कॉपीचा मोठा गैरप्रकार समोर आला आहे. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकांनी विविध केंद्रांवर दिलेल्या भेटीत तब्बल ४४ विद्यार्थी गैरप्रकार करताना आढळले आहेत. विशेष म्हणजे, केवळ विद्यार्थीच नव्हे तर या गैरप्रकाराला खतपाणी घालणाऱ्या १८ केंद्रसंचालक आणि पर्यवेक्षकांवरही प्रशासकीय कारवाईची शिफारस करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सर्वाधिक गैरप्रकार ज्ञानेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मांडवा (ता. रिसोड) येथे



आढळले असून तिथे २१ विद्यार्थी कॉपी करताना सापडले. त्यापाठोपाठ वाघमाय देवी आदिवासी कनिष्ठ महाविद्यालय, रुई गोस्ता (ता. मानोरा) येथे १७ विद्यार्थी आढळले. याशिवाय बाबासाहेब धाबेकर कनिष्ठ महाविद्यालय, रिसोड येथे ३, आप्पास्वामी कनिष्ठ महाविद्यालय, शेंदूरजना येथे २ आणि वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालय, किन्हीराजा येथे १ विद्यार्थी सापडला आहे.

कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी शिक्षणाधिकाऱ्यांनी खालील कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र विद्यापीठ मंडळ परीक्षेमधील गैरप्रकार कायदा १९८२ नुसार कारवाईची शिफारस केली आहे. मांडवा केंद्र: बी. पी. शिरसाट (केंद्रसंचालक), ए. पी. ठाकरे (मुख्याध्यापक), व्ही. एन. अंभोरे, एम. बी. कोकाटे, ए. एच. कायंदे, एम. पी. इंगळे आणि व्ही. पी. डाखोरे (पर्यवेक्षक).

रुई गोस्ता केंद्र: संतोष माणिक जाधव (केंद्रसंचालक), अतुलदेव निवृत्ती अंभोरे, कु. विपश्यना निळकंठ शिरसाट, गंगाधर सखाराम बोरकर आणि अमीत गजाननराव देशमुख (पर्यवेक्षक). इतर केंद्र: गजानन मधुकर घुले (केंद्रसंचालक - शेंदूरजना), सुहास महादेवराव शिंदे, प्रतिक राजेंद्र मडावी (पर्यवेक्षक - शेंदूरजना), जयसिंग कपुरा खचकड (प्राचार्य/केंद्रसंचालक - किन्हीराजा), रवी आत्माराम बावीसकर, विशाल किसन ताटके (पर्यवेक्षक - किन्हीराजा), व्ही. पी. राऊत (केंद्रसंचालक - रिसोड), एस. एस. लाव्हरे आणि शेख मो. शाकीर (पर्यवेक्षक - रिसोड).जिल्ह्यात अजूनही अनेक परीक्षा केंद्रे अशी आहेत जिथे छुप्या पद्धतीने सामूहिक कॉपी सुरू असल्याची चर्चा आहे. या कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, भविष्यात अशा सर्व संशयास्पद परीक्षा केंद्रांची माहिती लवकरच 'ब्रेकिंग न्यूज'च्या माध्यमातून प्रसिद्ध केली जाणार आहे.जिल्हा प्रशासनाच्या या धाडसी कारवाईचे सर्व स्तरातून स्वागत होत असून, कॉपीमुक्त परीक्षेसाठी अधिक कडक पावले उचलण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# कामगार महोत्सव २०२६ चे ना. संजय राठोड यांच्या हस्ते उदघाटन संपन्न; डॉ .विष्णूभाऊ उकंडे यांचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस प्रतिनिधी/उमेश साखरकर** : आर्णी येथे प्रेरणा संस्था अंतर्गत कामगार व उद्योग समिती यवतमाळ जिल्हा यांच्या वतीने तथा डॉ विष्णू भाऊ उकंडे यांच्या पुढाकारातून भव्य कामगार महोत्सव 2026 चे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाचे उदघाटन ना संजय राठोड पालकमंत्री तथा मृदा व जलसंधारण मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते संपन्न झाले.यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना ना राठोड यांनी कामगाराचे बचत गट करून त्यांचा सर्वांगीण विकास करणार असल्याचे सांगितले.त्याच प्रमाणे डॉ विष्णू उकंडे यांनी आर्णी तालुक्यातील



कामगार महिलांच्या उद्योग प्रशिक्षना करिता एक कोटीची मागणी केली असता

पालकमंत्री यांनी आर्णी येथे उद्योग प्रशिक्षण करिता अडीच कोटी रुपये देणार असल्याची घोषणा केली.त्याचप्रमाणे एक भाऊ म्हणून कायम कामगार व उद्योग समितीच्या महिला भगिनीच्या पाठीशी उभा राहणार असल्याचे सांगितले. यावेळी प्रेरणा संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात हस्तकला प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते,त्याचप्रमाणे नृत्य स्पर्धा, गायन स्पर्धा व होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,यावेळी अनेक भगिनींनी अप्रतिम नृत्य व गायन सादर केले.तसेच सहाय्यक आयुक्त कौशल्य विभाग यवतमाळ सुशील उचले यांनी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी राजुदास जाधव. राजेंद्र जाधव तहसीलदार वैशाख वाहूरवाघ,आर्णी नगरपरिषद उप नगराध्यक्ष निलेश गावंडे सभापती छबूताई चारोडे नगरसेवक पवन चाफले ,विशाल मनवर माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. रुक्मिणी उकंडे अश्विनी देशमुख, संध्या मुनेश्वर ,कविता चव्हाण ,कविता मोरे ,अभिलाष इंगोले तथा इर मान्यवर उपस्थित होते,यावेळी संचलन आर्शीया सैय्यद यांनी केले तर आभार संजय चव्हाण यांनी मानले

# १११ दिव्यांच्या तेजोमय प्रकाशाने न्हाली जेएनपीए टाऊनशिप" ;९० वा त्रिमूर्ती महाशिवरात्र सोहळा संपन्न!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी** : प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने 'शिव अवतरण से स्वर्णिम भारत' या संकल्पने खाली ९० वा 'त्रिमूर्ती महाशिवरात्र महोत्सव, जे एन पी ए टाऊनशिप मध्ये प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरिय विश्वविद्यालय जेएन पीए सेवा केंद्र आयोजित हा कार्यक्रम अत्यंत चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. 14 फेब्रुवारी 202६च्या सायंकाळी सूर्यास्त होताना जे एनपी ए परिसरात एका वेगळ्याच अध्यात्मिक ऊर्जेचा संचार झाला होता.

या सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे एकाच वेळी प्रज्वलित करण्यात आलेल्या 1111 पणत्या जेव्हा या पणत्या एका मागून एक प्रज्वलित झाल्या तेव्हा संपूर्ण परिसर एका दिव्य तेजोमय प्रकाशाने न्हाऊन निघाला .या लहानशा



पणत्यांच्या ज्योतीने अज्ञानाचा अंदाज दूर सारत जणू पृथ्वीवर ताऱ्यांचे अंगणच उतरल्याचा भास होत होता. हा झगमगाठ केवळ डोळ्यांना सुखद नव्हता तर उपस्थितांच्या मनातील विकार दूर करून तिथे ज्ञानाचा प्रकाश पसरवणारा ठरला .या प्रकाशाच्या सोबतीला असलेले १२ फूट उंचीचे भव्य शिवलिंग भक्तीचा एक अनोखा केंद्रबिंदू ठरले होते. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना बीके नयना दीदी म्हणाल्या की ,"महाशिवरात्रीच्या पवित्र पर्वी निराकार परमपिता परमात्मा शिव या पृथ्वीवर येऊन अधर्माचा विनाश करून पुन्हा एकदा स्वर्णसृष्टीची स्थापना करण्यासाठी शिवाचे हे अवतरण अस.ते जे एन पी ए विश्वविद्यालयाच्या संचालिका बीके उज्वला दीदी यांनी घेतलेल्या मेडिटेशनच्या सत्रामुळे उपस्थित भाविकांना अंतर्मनातील शांततेचा आणि शिव परमात्म्याच्या सानिध्याचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. या कार्यक्रमात लहान मुलांसाठी विविध गमतीशीर खेळ घेण्यात आले.

आणि भक्ती गीतांवर सादर केलेल्या नृत्यविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. या सोहळ्याला सोनी झा (सीआयएसएफ) प्रियवंदा तांबोटकर मॅडम (आर के एफ स्कूल), रेखा म्हात्रे (डोंगरी बचत गट अध्यक्षा) प्रेरणा पाटील (जिल्हा परिषद नवनिर्वाचित सदस्या) सुरेश बंडा ,मधुकर भाई ,चंद्रकांत भाई, रमेश भाई असे अनेक मान्यवर आणि भाई बहना उपस्थित होते. महोत्सवाचा समारोप प्रसाद ईश्वरिय भेट आणि ज्ञानाच्या संकल्पनेने झाला.

# महाशिवरात्रीनिमित्त श्री जिवनेश्वर देवस्थानात भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित** : श्री जीवनेश्वर (स्वयंभू जिवनेश्वर) व श्री भुवनेश्वर देवस्थान ट्रस्टतर्फे यंदाचा महाशिवरात्री महोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरा होत आहे. दि. १० फेब्रुवारी २०२६ पासून ज्ञानेश्वरी व शिवलीलामृत पारायणास प्रारंभ झाला. महाशिवरात्री निमित्त मंदिर परिसरात पहाटेपासूनच भाविकांची वर्दळ पाहायला मिळाली.

मंदिरात आकर्षक व देखणी फुलांची सजावट करण्यात आली असून संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला. दररोज होणाऱ्या पारायणामुळे वातावरणात आध्यात्मिक ऊर्जा व शांततेचा अनुभव भाविकांना मिळत आहे.

दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी पारायणाची सांगता होणार असून त्यानंतर भजन, दिंडी, दहीहंडी, गोपाळकाला व विशेष पूजन असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच दुपारी १२ ते ३ या वेळेत महाप्रसाद भोजनाचे आयोजन करण्यात आले




आहे.

या सर्व कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री जीवनेश्वर देवस्थान ट्रस्टचे वहिवाटदार व व्यवस्थापन मंडळाचे प्रतिनिधी श्री अनंत लक्ष्मण गुरव यांनी केले आहे.महाशिवरात्रीच्या निमित्ताने भक्तांसाठी हा आध्यात्मिक सोहळा श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर संगम ठरत आहे.

# महाशिवरात्री निमित्त ठाणे व मुंबईत अंतर योग फाउंडेशनचे स्वामी उपेंद्र महाराज यांच्या नेतृत्वाखाली विशेष साधना संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी:** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त अंतर योग फाउंडेशन तर्फे ठाण्यात प्रथमच आयोजित करण्यात आलेली सर्वांसाठी खुली आणि मोफत जीवन-परिवर्तनकारी विशेष साधना मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात संपन्न झाली. फाउंडेशनचे संस्थापक ब्रह्मर्षी आचार्य उपेंद्र जी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या भव्य आध्यात्मिक सोहळयास ठाणे व मुंबई परिसरातील शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सकाळी ७ वाजता प्रारंभ झालेल्या या साधना शिबिरात आरोग्य, समृद्धी, सुदृढ नातेसंबंध, शैक्षणिक प्रगती आणि आध्यात्मिक उन्नती यांसाठी विविध प्रभावी उपक्रम आयोजित करण्यात आले. सहभागी साधकांनी ध्यान,



जप, प्रार्थना आणि उर्जाधारित साधना यांचा अनुभव घेत आत्मिक समाधान लाभल्याचे सांगितले.

कार्यक्रमादरम्यान महामृत्युंजय यज्ञ आणि शिवलिंगावर अभिषेक यांसारखे पारंपरिक व प्रभावी विधी संपन्न झाले. इच्छापूर्तीसाठी तपस्वी ब्राह्मणांद्वारे संकल्प करण्यात आले. तसेच उपस्थितांसाठी तज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य सल्ला देण्यात आला. विशेष म्हणजे, हीलिंग साधनेचे परिणाम जाणून घेण्यासाठी पूर्व व पश्चात वैद्यकीय तपासणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली.

विद्यार्थ्यांसाठी अभ्यासात प्रावीण्य मिळविण्यासाठी विशेष साधना सत्र आयोजित करण्यात आले होते. अनेक पालकांनी आपल्या मुलांसह सहभाग नोंदवून सकारात्मक ऊर्जा, मानसिक स्थैर्य आणि आत्मविश्वासात वाढ झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. सहभागींनी तणाव व्यवस्थापन, भावनिक संतुलन, झोपेची गुणवत्ता आणि नातेसंबंधांमध्ये सकारात्मक बदल जाणवल्याचे सांगितले. अनेकांनी "अशी दिव्य साधना आयुष्यात प्रथमच अनुभवायला मिळाली," असे म्हणत आयोजकांचे आभार मानले.

यावेळी ब्रह्मर्षी आचार्य उपेंद्र जी म्हणाले, "योग्य साधना केल्यास आत्ता आणि इथे त्वरित फलश्रुती प्राप्त होते, यालाच खरे अध्यात्म म्हणतात." सामाजिक स्वास्थ्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने अंतर योग फाउंडेशन देशभरात अशा कार्यशाळांचे आयोजन करत असून, तीन कोटी लोकांपर्यंत ही अद्वितीय साधना पोहोचविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, फाउंडेशनची 'सायन्स ऑफ हीलिंग' ही संकल्पना विविध राष्ट्रीय संस्थांकडे सादर करण्यात आली असून, पारंपरिक ज्ञानपद्धती आणि आधुनिक विज्ञान यांचा समन्वय साधण्याच्या या प्रयत्नांचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.ठाण्यात सकाळी पार पडलेल्या या कार्यक्रमानंतर मुंबईत संध्याकाळी आयोजित सत्रालाही मोठ्या संख्येने साधक उपस्थित राहिले. भविष्यातही अशा मोफत आणि सर्वसमावेशक साधना शिबिरांचे आयोजन करण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

# छत्रपती शिवाजी महाराज यूथ असोसिएशनतर्फे लंडन येथे अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ शोकसभा

**दैनिक युवक आधार**

**लंडन / प्रतिनिधी** : छत्रपती शिवाजी महाराज युवक संघठना तर्फे आज लंडन येथे महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते व उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ भावपूर्ण शोकसभेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात त्यांच्या सार्वजनिक जीवनातील योगदानाचा तसेच महाराष्ट्र भवन, लंडनसाठी जाहीर करण्यात आलेल्या ५ कोटी रुपयांच्या मदतीचाही उल्लेख करण्यात आला. त्यांच्या कार्याचा आढावा घेताना उपस्थितांनी विविध आठवणींना उजाळा दिला.

या कार्यक्रमाला लंडन व परिसरातील मराठी समाजातील नागरिक मोठ्या संख्येने



उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्व. अजितदादांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून आदरांजली वाहिली.

मौनानंतर असोसिएशनचे अध्यक्ष धीरजसिंह तौर यांनी अजितदादा पवार यांच्या सार्वजनिक जीवनातील योगदान, विकासकामांबद्दलची बांधिलकी तसेच समाजासाठी केलेल्या कार्याची आठवण करून दिली.

या कार्यक्रमाच्या आयोजनात धीरजसिंह तौर, सुनिल पाटील, स्वराज मोहिते, आशुतोष धमले, स्वप्नील गावडे, पवन खरात, कौस्तुभ रमेकर, यशवंत गुरव, यश सुतार यांसह संघटनेतील सदस्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच मराठी समाजातील अनेक मान्यवर व बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम शांत, भावनिक आणि आदरपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# हनुमान प्रासादीक मोठे भजन मंडळ नवघर यांच्या वतीने महाशिवरात्री उत्सव मोठ्या भक्ती भावात संपन्न !!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर** : उरण तालुक्यातील नवघर गावात वाड-वडीलांच्या प्रथे नुसार सालाबाद प्रमाणे याही वर्षि हनुमान प्रासादीक भजन मंडळ नवघर यांच्या वतीने महाशिवरात्री उत्सव मोठ्या भक्ती भावात संपन्न झाला असून सकाळी महादेवाच्या पिंडीचे मंगळस्नान करून अभिषेक करण्यात आल्या नंतर शिवभक्त भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावून मनोभावे दर्शन घेतले. मंदिरात सकाळपासून भाविकांची



रेलचेल चालू असून सकाळी १०-०० वाजता ह.भ.प.कुमारी पायल दिदी पाटील(दादर विश्वधर्म वारकरी शिक्षण संस्था वारदोली प्रबळगड) यांचे सुश्राव्य किर्तन झाले असता या किर्तनाला नवघर गावासह परिसरातील शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थीत होते.नवघर गावातील तसेच परिसरातील भाविक हे येवढ्या लहान वयातील कुमारी ह.भ.प.पायल दिदीचे किर्तन मनोभावे ऐकत होते.किर्तना नंतर सर्वांमिळून श्रीची आरती घेऊन सदर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.यावेळी हनुमान प्रासादीक भजन मंडळाचे सर्व सभासद आप-आपल्या घरातील सदस्यांसह मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# पी.पी. खारपाटील विद्यालयाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** चिरनेर येथील पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शुक्रवारी (दि.13) सकाळी 11 वाजता मोठ्या आनंदी व प्रसन्न वातावरणात पी.पी. खारपाटील माध्यमिक शाळेत संपन्न झाला. या निरोप समारंभाच्या निमित्ताने, अध्यक्ष पांडुरंग खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, समीर खारपाटील, सागर खारपाटील, अर्चना खारपटील, वर्षा खारपाटील, सुनीता खारपाटील यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा व आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या तर प्रशासकीय अधिकारी व्ही.ए.पाटील, मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादूर , कार्याध्यक्ष विजय पवार, जि.बी. म्हात्रे, शिक्षक प्रतिनिधी जिचंद भगत, डी.पी. पाटील, अशोक पाटील,



पुंडलिक भवर, शुभम जाधव, अतुल गावंड, मोहिते, प्रदीप रसाळ,उत्तम म्हात्रे, रेखा धराडे मंथना ठाकूर, विनिता भोईर, माधुरी ठाकूर,अस्मिता निकम, विशाखा पाटील, मयुरी नारंगीकर, प्रियांका वशेणीकर, ऋतुजा ठाकूर, कृष्णा माळी, संतोष चव्हाण, शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी निरोप समारंभास उपस्थित राहून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलान करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांसह शिक्षकांना फुलगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रारंभी प्रस्तावना त्रिशा म्हात्रे व जिज्ञासा पाटील यांनी सुंदर शब्दात केली, त्यानंतर विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही आपले मनोगत व्यक्त केले, भविष्यात आपण मोठे होणार आहात, आई वडिलांना विसरू नका, मोठ्यांचा आदर करा, स्पर्धेचे युग आहे, सर्वोच्च स्तरावर विराजमान व्हा, मार्गदर्शनाची जेव्हा जेव्हा गरज लागेल,तेव्हा केव्हाही या शाळेत या. शाळा तुमचीच आहे.असे शिक्षकांनी आपल्या भाषणातून सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांकडून फुलगुच्छ, भेटवस्तू व अल्पोहार देण्यात आला.

# हजारोंना थेट लाभ!;वाशिममध्ये विधी सेवा महाशिबीरात शासकीय योजनांचा वर्षाव

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : नागरिकांना शासकीय योजनांचा थेट लाभ मिळावा आणि न्याय व कल्याणकारी योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा विधीज्ञ संघ यांच्या संयुक्त विद्यमाने वाशिम येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा भव्य महामेळावा उत्साहात पार पडला.

अकोला रोडवरील वाटाणे लॉन येथे आयोजित या महामेळाव्याचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयचे न्यायमूर्ती तथा पालक न्यायमूर्ती अभय ज. मंत्री आणि नागपूर खंडपीठाचे पालक न्यायमूर्ती महेंद्र एम. नेरलीकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा



जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष अनिल सुब्रमण्यम, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पीत चौहान, अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, जिल्हा शल्य चिकित्सक अनिल कावरखे, मुख्याधिकारी निलेश गायकवाड, जिल्हा विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष अनुप बाकलीवाल यांच्यासह न्यायिक अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाशिबीरात विविध शासकीय विभागांचे एकूण ३६ स्टॉल्स उभारण्यात आले होते. या माध्यमातून तब्बल ५२ शासकीय योजनांची सविस्तर माहिती नागरिकांना देण्यात आली. मान्यवरांनी प्रत्येक स्टॉलला भेट देऊन योजनांच्या अंमलबजावणीची पाहणी केली व लाभार्थ्यांशी संवाद साधला.

या महामेळाव्यात कृषी विभागामार्फत श्रीराम मोरे यांना ट्रॅक्टर तर ज्योती घुले यांना हार्वेस्टरचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत सुलभा रोकडे व अलका घोलप यांना फिरते विक्री केंद्र वाहन प्रदान करण्यात आले. तसेच जीजाबाई मेंडके यांना विहिरीचा लाभ, संतोष देखने यांना अंत्योदय अन्न योजना रेशन कार्ड आणि वैष्णवी मुठाळ यांना अधिवास योजनेचा लाभ देण्यात आला.

जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत 'मिनी हॉस्पिटल' स्टॉलद्वारे नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. विविध तपासण्या, वैद्यकीय सल्ला आणि आरोग्य योजनांची माहिती यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

या महाशिबीरामुळे हजारो नागरिकांना शासकीय योजनांची माहिती व थेट लाभ मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. जी. चौखंडे यांनी केले.

**विधी सेवा महाशिबीराची ठळक वैशिष्ट्ये**

३६ शासकीय स्टॉल्सद्वारे ५२ योजनांची माहिती

न्यायमूर्तींच्या हस्ते महामेळाव्याचे उद्घाटन

ट्रॅक्टर, हार्वेस्टर, वाहन व विविध लाभांचे वितरण

'मिनी हॉस्पिटल'द्वारे मोफत आरोग्य तपासणी

हजारो नागरिकांनी घेतला योजनांचा थेट लाभ

न्याय, आरोग्य, रोजगार व सामाजिक योजनांची एकत्रित सुविधा

वाशिम जिल्ह्यातील नागरिकांसाठी महाशिबीर ठरले लाभदायी व मार्गदर्शक

# उंच घाटातील शाळेचा दिमाखदार कलाविष्कार सोहळा; विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उत्स्फूर्त दाद

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे** : उंच घाट परिसरात वसलेल्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे विद्यार्थ्यांचा भव्य कलाविष्कार सोहळा उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला.आकर्षक सजावट, रंगीबेरंगी फुगे,मनोहारी रांगोळ्या आणि विद्यार्थ्यांनी साकारलेल्या विविध कलाकृतींमुळे शाळेचा परिसर खुलून दिसत होता. विशेष आकर्षण ठरलेला सेल्फी पॉईंट उपस्थितांच्या उत्सुकतेचा केंद्रबिंदू ठरला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य,गायन, नाटिका, वक्तृत्व अशा विविध कलाप्रकारांमधून आपले कौशल्य प्रभावीपणे सादर केले. प्रत्येक सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.कार्यक्रमासाठी पालकांकडून तब्बल ₹१६,००० इतकी



बक्षीस रक्कम जमा करण्यात आली, ही विशेष उल्लेखनीय बाब ठरली.

कार्यक्रमास माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष रवींद्र काळे,शालेय व्यवस्थापन समिती सदस्य बंटी काळे,राजेंद्र दुतोंडे, रविंद्र साखळे,अण्णा वाघ, समाजसेवक राजू माळी,नगरसेवक गजानन कुडके,

संतोष बोडके,रंगनाथ तेली,रिपब्लिकन सेना तालुकाध्यक्ष अंकुश पगारे तसेच शंकर जेठे, कृष्णा पाटील,अरुण सोहनी, संदीप चौधरी,दत्तू रोकडे,सुरेश घन,अजय नेरपगारे,बापू मानकर,योगेश श्रीखंडे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. केंद्रातील शिक्षक नरेंद्र बारी, रामदास चंडोल,भास्कर चौधरी,नितेश गव्हादे, महादू पंडीत यांच्यासह पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांच्या सक्षम नेतृत्वाखाली शाळेचा शैक्षणिक व भौतिक विकास सातत्याने होत आहे. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन, आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित होत असून ग्रामस्थांचा शाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शाळेने सातत्याने तालुकास्तरीय स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. 'माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमात तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळविला असून राज्यस्तरीय 'गौरव किल्ला' सन्मान प्राप्त झाल्याने शाळेचा लौकिक अधिक वृद्धिंगत झाला आहे. परिणामी विद्यार्थी संख्येतही लक्षणीय वाढ होत आहे.

कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविल्याबद्दल सुरेखा चौधरी, पंकज रगडे,रामचंद्र महाकाळ,प्रतिभा कोळी,सविता पाटील,गणेश बाविस्कर, अकुश काळे,मंगला बोरसे,मंदा म्हस्के, पांडुरंग बारगजे,पूनम कल्याणकर, शुभम देसले, शेख विकार,बिलाल बागवान आदी शिक्षक व मान्यवरांचे आभार मानण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज रगडे व सुरेखा चौधरी यांनी केले.

उंच घाटातील ही शाळा आज शिक्षण, संस्कार आणि गुणवत्ता यांचे आदर्श केंद्र म्हणून उदयास येत आहे.या कलाविष्कार सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळाली असून शाळेची प्रगतीची वाटचाल भविष्यातही अशीच सुरू राहील,असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# मालनेश्वर संस्थान मालेगांव येथे रक्तदान शिबीर संपन्न; ६२ रक्तदात्यांनी नोंदविला सहभाग

**दैनिक युवक अधार**

**तालुका प्रतिनिधी प्रकाश भुरे :** मालेगांव शहरातील अतिशय प्राचीन व भाविकांचे आराध्य स्थान असलेले ग्रामदैवत श्री मालनेश्वर संस्थान शिव चौक मालेगांव महाशिवरात्री निमित्ताने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असून एकूण ६२ शिवभक्तांनी रक्तदान करीत शिबीर अतिशय भक्तिमय वातावरणात संपन्न झाले मालेगांव शहरातील अतिशय प्राचीन असलेले आणि भाविकांचे आराध्य स्थान असलेले ग्रामदैवत श्री मालनेश्वर संस्थान शिव चौक येथे महाशिवरात्रीचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिर पार पडले असून यामध्ये मालेगांव चे प्रथम नागरिक मालेगांव चे नगराध्यक्ष श्री ओमप्रकाश खुरसडे यांनी सर्वप्रथम रक्तदान करीत शिबिराला सुरवात करण्यात आली असून एकूण ६२ शिवभक्तांनी या शिबिरात सहभाग नोंदवित शिबीर यशस्वीपणे पार पडले असून रक्त संकलन करण्यासाठी शासकीय रक्तपेठी



जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांना आमंत्रित करण्यात आले असून रक्त संक्रमन अधिकारी म्हणून डॉ.नेमाडे सर डॉ विनिती इंगळे मॅडमडॉ पडघण सर डॉ सुनया तापी मॅडमजनसंपर्क अधिकारी सचिन दंडे सर रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी सिद्धविनायक स्वामी सर, सागर मुके प्रियांका सावंत नरेंद्र सांगळे सुनील सावके अंकुश अंभोरे यांच्यासह शिबिर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी श्री मालनेश्वर संस्थांचे स्वयंसेवक यांनी मोलाचे सहकार्य केले

# एआयच्या क्षेत्रात आपण कुठे आहोत?

वर्ष २०१४ , इयन गुडफेलो कॅनडातील मॉंट्रियाल विद्यापीठात कॉम्प्युटर सायन्स मध्ये पीएच. डी. करत होता. नुकतीच डॉक्टरेट मिळालेल्या सहकाऱ्याच्या सेलिब्रेशन पार्टीतील हा प्रसंग. एका किचकट रिसर्च प्रोजेक्ट विषयी इयनचे काही मित्र त्याचं मार्गदर्शन घेत होते, 'इयन, आम्ही असा एक कॉम्पुटर प्रोग्राम बनवतोय, जो आजवर कुठेही अस्तित्वात नसलेले फोटो पूर्णतः स्वतःच तयार करू शकेल. पण त्यात काही अडचणी आहेत. आम्ही अगदी आधुनिक मशीन लर्निंग मॉडेल्स वापरतोय. क्लिष्ट स्टॅटिस्टिक्सची समीकरणं सोडवून, सखोल अनॅलिसिस करून बघितले. पण रिझल्ट्स खूपच निराशाजनक आहेत. काय करायला हवं आम्ही...?'

'हा अप्रोच नाही चालणार इथे. काहीतरी नाविन्यपूर्ण करावं लागेल!', असं मोजकंच काहीतरी बोलून इयनने पार्टीतून काढता पाय घेतला. आणि थेट रिसर्च लॅब गाठली. काहीतरी भन्नाट कल्पना त्याला सुचली होती. रात्रभर तो कम्प्युटर प्रोग्राम लिहीत होता. आणि पहाट होता होता, आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या क्षेत्रातील संशोधनासाठी त्याने एक नवी दिशा शोधून काढली होती. त्याने लावलेला हा शोध म्हणजेच जनरेटिव्ह ॲडव्हर्सरियल नेटवर्कस (GAN) मॉडेल!

इथूनच जनरेटिव्ह एआयमधील संशोधन अतिशय वेगाने पुढे गेले. जनरेटिव्ह ॲडव्हर्सरियल नेटवर्कस (GAN) नंतर ट्रान्सफॉर्मर मॉडेल्स आले. आणि त्यातूनच २०२२ साली जगाला भुरळ पाडणाऱ्या चॅटजीपीटीचा जन्म झाला. इयन गुडफेलो खऱ्या अर्थाने एआय विश्वातील ओव्हरनाईट सेलेब्रिटी बनला! ह्या संपूर्ण प्रसंगाची आठवण येण्याचं कारणं म्हणजे, एआय क्षेत्रातील महत्वपूर्ण जागतिक शिखर संमेलन १६ ते २० फेब्रुवारी दरम्यान दिल्लीमध्ये होत आहे. आजवर होणारं तसं हे चौथं संमेलन आहे. इंग्लंडमधील ब्लेचले पार्कवर पार पडलेल्या पहिल्या संमेलनावर एआय विषयीच्या भीतीचं सावट होतं. मानवी अस्तित्वासाठी एआयच्या घातक परिणामांवर तिथे जी चर्चा झाली, त्याला हळूहळू एक सकारात्मक वळण मिळत गेलं.

एआय संशोधन, उद्योग, व्यापार इत्यादी क्षेत्रातील अनेक दिग्गज मंडळी ह्या संमेलनात एकत्र येणार आहेत. त्यासोबतच बऱ्याच देशांच्या वरिष्ठ राजकीय नेत्यांची हजेरी इथे लागणार आहे. ह्या संमेलनाचं यजमान पद म्हणजे जी ट्वेंटी नंतर एआय क्षेत्रात ग्लोबल साऊथचं नेतृत्व प्रस्थापित करण्याची भारतासाठीची मोठी संधी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अनेक व्यासपीठांपारून एआय, डीपटेक अशा क्षेत्रांमध्ये भारताने आत्मनिर्भर बनायला हवं आणि त्यासाठी तरुणांनी उत्तम दर्जाचं संशोधन करावं; नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घ्यायला हवेत, असं आवाहन केलं आहे. अमेरिका, चीन आणि काही युरोपातील देशांनी ह्यापूर्वीच त्यात निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केलं आहे. तशात आपण केवळ जागतिक ग्राहकपेठ न होता, स्वतःचं एक स्वतंत्र अस्तित्व निर्माण करायचं असेल, तर इयन गुडफेलोच्या उदाहरणातून बरंच काही शिकण्यासारखं आहे.

एआय इम्पॅक्ट संमेलनाच्या पार्श्वभूमीवर भारताची एआय-डीपटेकमधील विद्यमान स्थिती आणि आत्मनिर्भरतेपर्यंतचा प्रवास एका वेगळ्या दृष्टिकोनातून बघण्याचा हा प्रयत्न.

**एआय प्रतिभा-कौशल्य विकास आणि विस्तार:**

इयनची गोष्ट थोडी पुढे नेऊ. पीएच. डी. नंतर इयनने गूगलची एआय रिसर्च टीम जॉईन केली आणि आपलं संशोधन पुढे नेलं. नंतर त्याने ओपन एआय ह्या चॅट जीपीटी बनवणाऱ्या कंपनीच्या रिसर्च टीम मध्ये प्रवेश मिळवला. विद्यापीठात सुरू केलेलं संशोधन व्यावसायिक क्षेत्रातही तितक्याच जोमाने तो पुढे घेऊन जात होता. असं करणारा इयन हा काही एकमेव विद्यार्थी नव्हे. गॉडफादर ऑफ एआय अशी उपाधी मिळालेले आणि २०२४ सालचा नोबेल पुरस्कार मिळवणारे जेफरी हिंटन हेसुद्धा गुगल रिसर्च टीममध्येच संशोधनाला नवी दिशा देत होते. त्यांचाच विद्यार्थी असलेल्या इल्ल्या सुत्स्कीवर ह्याने काही सहकाऱ्यांसह ओपन एआय कंपनीची स्थापना केली. चॅट जीपीटी बनवणाऱ्या टीमचा तोच मुख्य एआय सायंटिस्ट होता. अशी असंख्य उदाहरणं आपल्याला सापडतील.

मूळ मुद्दा असा की अमेरिकेत मूलभूत संशोधनासाठी लागणारी एक अतिशय प्रगल्भ इकोसिस्टिम आहे. शिक्षण संस्थांसोबतंच व्यावसायिक क्षेत्रातही अशा संशोधनासाठी प्रचंड वाव आहे. आणि त्यातूनच एआयसाठी लागणारं विशेष प्रतिभा-कौशल्य वाढीस लागतं. ह्या अनुषंगाने भारतातील परिस्थितीचा आढावा घेतला तर शासनातर्फे उचलली जाणारी काही रचनात्मक पावलं ठळकपणे दिसतात. उदाहरणार्थ इंडिया एआय फ्युचर स्किल्स ह्या उपक्रमाअंतर्गत पदव्युत्तर तसेच पीएच. डी. अभ्यासक्रमांमध्ये एआय विषयी अधिक भर देण्याचा प्रयत्न होत आहे. स्टॅनफर्ड विद्यापीठाच्या २०२४ च्या एआय इंडेक्स रिपोर्ट नुसार एआय कौशल्य प्रसाराच्या बाबतीत भारत अगदी अमेरिका आणि जर्मनीच्याही पुढे आहे. इंडिया स्किल्स रिपोर्ट सांगतो की भारतातील व्यावसायिक क्षेत्रातील एआय मध्ये कौशल्य मिळवलेल्यांची संख्या गेल्या ८-१० वर्षांमध्ये १४ पट वाढली आहे, इत्यादी.

कारण इथेच एक विरोधाभास दिसतो. आज आपल्याकडे स्पेशलाइज्ड एआय एक्सपर्ट्स आणि एआय इंजिनियर्सची पुरेशी उपलब्धता नाही. विद्यापीठांमधील थिओरिटिकेल नॉलेज आणि व्यवसाय क्षेत्रात लागणारं आधुनिक कौशल्य ह्यात एक दरी निर्माण झाली आहे. पीएच. डी. नंतर त्या संशोधनाला पुढे नेण्यासाठी संधी देणारी दालनं नाहीत. खासगी क्षेत्रातही अशा संधी फार नाहीत. मग टॉप टॅलेंटला परदेशाची वाट धरावी लागते.

अशा परिस्थितीत कौशल्य विकास केंद्रे पुरेशी होणार नाहीत. इथे गरज आहे ती ॲकेडेमिया आणि इंडस्ट्री ह्यांना जोडणाऱ्या प्राविण्यता केंद्रांची (सेंटर ऑफ एक्सलन्स)! सोबतंच आपल्याला शैक्षणिक क्षेत्रात अगदी उद्देशपूर्ण असे आमूलाग्र बदल घडवून आणावे लागतील. अभ्यासक्रमांमध्ये मूलभूत बदल करावे लागतील, प्रकल्प आणि प्रशिक्षणावर अधिक भर द्यावा लागेल.

**संयमी संशोधन आणि आर्थिक गुंतवणूक:**

पुन्हा इयनच्या गोष्टीकडे वळूया. त्याने GAN मॉडेलचा शोध २०१४ साली लावला. आणि चॅट जीपीटीच्या आविष्काराला त्यानंतरही आणखी ७-८ वर्षे लागली. बरं इयन चा शोध हा काही जनरेटिव्ह एआय मधील पाहिला प्रयत्न नव्हता. १९५२ साली Christopher Strachey ह्या ब्रिटिश कंप्युटर सायंटिस्ट ने लव्ह-लेटर प्रोग्रॅम लिहिला होता. लेखी मजकूर संगणकाद्वारे तयार करण्याचा हा खरा पहिला प्रयोग. पुढे १९६६ साली एलिझा हा कंप्युटर प्रोग्रॅम मानसशास्त्र तंज्ञाप्रमाणे संवाद साधू शकत होता. नंतर Natural Language Processing (NLP) ही शाखा नावारूपाला आली. मग मेंदूच्या रचनेवरून प्रेरणा घेऊन आर्टिफिशियल न्यूरल नेटवर्कसचा शोध लागला, तोवर २००३ साल उजाडलं होतं. हा संपूर्ण पन्नास वर्षांचा प्रवास होता. मूलभूत संशोधनासाठी वर्षानुवर्षांच्या अशाच अविरत प्रयत्नांची, संयमी संशोधनाची आवश्यकता असते.

**लोकशाही दिवसाढवळ्या मरू शकते!**

इथे नाण्याची दुसरी बाजू समोर येते – आर्थिक गुंतवणूक. इंडिया एआय मिशन आणि स्टार्ट अप फंडच्या माध्यमातून शासनाने भक्कम गुंतवणूक केली आहे. पण थोडं खोलवर बघितलं तर असं लक्षात येतं की गेल्या दहा-अकरा वर्षांमधील स्टार्ट अपसाठी मिळालेल्या एकूण (खासगी आणि शासकीय ) गुंतवणुकीपैकी केवळ एक टक्का गुंतवणूक डीपटेकसाठी आहे. रिसर्च आणि डेव्हलपमेंट मध्ये भारतातील गुंतवणूक जीडीपीच्या केवळ ०.६४% एवढीच आहे.

# गजानन भक्त परिवाराचा आधारवड हरपला; कुसुमताई वाडेकर यांना अश्रुपूर्ण निरोप

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे** : थोर गजानन भक्त,वसल्या मूर्ती आणि परिसरातील सर्व भाविकांचे आश्रयस्थान असलेल्या श्रीमती कै. कुसुमताई रघुनाथराव वाडेकर (अध्यक्षा, संत श्री गजानन महाराज मंदिर सोयगाव) यांचे शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ७:५५ वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने सोयगाव व आमखेडा परिसरात शोककळा पसरली असून गजानन भक्त परिवाराने आपला मातृवत आधारवड गमावला आहे.

"भक्तीचा दीप लावून, वटवृक्ष जोपासला... आज तो गजानन भक्त चरणी विसावला..." या ओळी त्यांच्या आयुष्याचे सार सांगून जातात.अत्यंत साध्या कुटुंबातून सुरू झालेला त्यांचा भक्तीचा प्रवास आज एका मोठ्या आणि एकजुटीच्या भक्त परिवाराच्या



रूपाने सर्वांसमोर उभा आहे. मंदिराच्या पायाभरणीपासून ते विविध धार्मिक उपक्रमांच्या यशस्वी आयोजनापर्यंत त्यांचे योगदान मोलाचे राहिले.

दरवर्षी मंदिरात आयोजित करण्यात येणाऱ्या गजानन महाराजांच्या पारायण सोहळ्यात त्या स्वतः उपस्थित राहत असत. पारायण, हरिनाम सप्ताह, कीर्तन, महाप्रसाद यांसारख्या कार्यक्रमांत त्यांनी केवळ नेतृत्वच केले नाही, तर प्रत्यक्ष सहभाग घेत भक्तांना प्रेरणा दिली. त्यांच्या निष्ठा, समर्पण आणि सेवाभावामुळे मंदिर परिसरात भक्तीचा मळा फुलला आणि अनेकांना अध्यात्मिक मार्गदर्शन मिळाले.

रविवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता सोयगाव येथे त्यांचा अंत्यविधी पार पडला. या वेळी "जय गजानन" च्या जयघोषात आणि वेदमंत्रांच्या मंत्रोच्चारात वातावरण भारावून गेले होते. ना भूतो असा जनसमुदाय उपस्थित होता. जय गजानन भक्त परिवारातील महिला व पुरुषांचे अश्रू अनावर झाले होते. त्यांच्या सुपुत्राने मंत्रोच्चारात विधीपूर्वक अग्नीडाग देत अंतिम संस्कार केले.कै.कुसुमताई वाडेकर या केवळ मंदिराच्या अध्यक्षा नव्हत्या,तर संपूर्ण परिसरासाठी श्रद्धा, सेवा आणि समर्पण यांचे प्रतीक होत्या. त्यांच्या जाण्याने सोयगाव परिसरातील गजानन भक्त परिवाराची मोठी हानी झाली आहे.त्यांनी रुजवलेले संस्कार आणि भक्तीची परंपरा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल,अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि वाडेकर परिवाराला या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो, हीच गजानन चरणी प्रार्थना व्यक्त होत आहे.

गजानन भक्त परिवारातील ज्येष्ठ कार्यकर्ते राजेंद्र झवर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले की—"कै. कुसुमताई वाडेकर या आमच्या गजानन भक्त परिवाराच्या खऱ्या अर्थाने मातृवत आधारस्तंभ होत्या.त्यांनी मंदिराच्या कार्यासाठी आयुष्यभर निस्वार्थ भावनेने सेवा केली.त्यांचा साधेपणा,शांत स्वभाव आणि प्रत्येक भक्ताला आपलेसे करून घेण्याची वृत्ती आम्हाला नेहमी प्रेरणा देत राहील.

त्यांच्या जाण्याने मंदिर व संपूर्ण सोयगाव परिसराने एक मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व गमावले आहे. गजानन महाराज त्यांच्या आत्म्यास चरणी स्थान देवो, हीच प्रार्थना."

# एस.एम.हायस्कूल कणकवली,१९७६ची बॅच, वर्ष५०वे आयोजित स्नेह मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**कणकवली प्रतिनिधी/ गुरुनाथ तिरपणकर** : लहानपणीचे मित्र५०वर्षापुर्वी एकाच शाळेत शिक्षण प्राप्त करताना त्यावेळचे कौटुंबिक वास्तल्य व जुन्या आठवणी डोळयासमोर आल्या की मन सुखावत व डोळे नकळत पाणावले जातात.त्याकाळचा हा प्रवास खडतर पण प्रेरणादायी होता.त्याच अनुषंगाने जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी एस.एम.हायस्कूल कणकवली१९७६ची बॅच,वर्ष५०वे आयोजित स्नेह मेळावा आचरा बीच रिसॅार्ट येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.तत्पुर्वी कणकवली येथील एस.एम.हायस्कूलच्या सभागृहात सेवा निवृत्त गुरुजींचा सत्कार व आशिर्वाद घेऊन१३फेब्रुवारीते १५फेब्रुवारी२०२६या कालावधीत आयोजित कार्यक्रमाला सुरुवात केली.कार्यक्रमाच्या अक्षस्थानी एस.एम.हायस्कुल प्रशालेचे मुख्याध्यापक जी.एन.बोडके सर यांची निवड करण्यात आली.त्यांचा सत्कार जेष्ठ सेवा निवृत्त गुरुवर्य जी.ए.सावंत सर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, भेटवस्तू व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला.तसेच सेवा निवृत्त गुरुवर्य नाईक सर,जी.ए.सावंत सर,श्रीमती सावंत मॅडम, करंबेळकर मॅडम,म्हसकर मॅडम यांचा सत्कार माजी विद्यार्थी ॲड.सतिश नाडकर्णी, डॉ.संदीप कदम, संजय पाध्ये, डॉ.सुनिता उपाध्ये,भारती वर्दम, निर्मला काणेकर यांनी केला.या सर्व गुरुवर्यांना शाल, श्रीफळ, भेटवस्तू व स्मृतिचिन्ह प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी जेष्ठ गुरुवर्य जी.ए.सावंत सर यांनी सर्वांना मोलाचे मार्गदर्शन केले.तसेच माजी विद्यार्थी डॉ.संदीप कदम व अशोक चिंदरकर यांनी शालेय जीवनातील जडणघडणीचा आलेख मांडला व जुन्या आठवणींना उजाळा देत गुरुवर्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त



केली.कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक जी.एन.बोडके सर गुरु-शिष्याचे नाते दृढ आणि कीती घट्ट असते हे अधोरेखित केले व गौरवोद्गार काढले.आणि दुग्धशर्करा योग म्हणजे५०वे वर्ष आणि१९७६ची बॅच मुख्याध्यापक जी.एन.बोडके सर याचा जन्म१९७६सालचा, म्हणजे हे माजी विद्यार्थी-विद्यार्थिंनी माझे मातापिता आहेत हे आवर्जून सांगितले व समाधान व्यक्त केले.आताचे गुरुशिष्याचे नाते५०वर्षापूर्विचे शालेय शिक्षण व आताची शिक्षण पध्दतीत जमीनआसमानीचा फरक आहे व इतर बाबतीत सखोल मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन माजी विद्यार्थी भरत तोरसकर यांनी काव्यमय पद्धतीने खुमासदार व उत्कृष्टरित्या केले.या शालेय कार्यक्रमानंतर दोन दिवसीय गेटूगेदर साठी आचरा बीच रिसॅार्ट येथे मार्गस्थ झालो.आचरा रोड वरिल कांदळवन येथे बोट सफारी केली, वाडेकरकाका यांनी पर्यावरण, शास्त्रीय, नैसर्गिक, औषधयुक्त वनस्पती यासंदर्भात मौलिक माहिती दिली.ओझर येथे पांडव कालीन गुहेत ब्रम्हानंद स्वामींच्या समाधीचे दर्शन घेतले. सिंधुदुर्ग कील्ला ते ओझर शिवकालीन भूयारी मार्गाची पहाणी केली.मालवण येथे जयवंत साळगावकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या सुवर्ण गणेश मूर्तीचे दर्शन घेतले.तसेच राजकोट येथील उभारलेल्या भव्य अशा पुर्णाकृती छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे दर्शन घेतले. कांदळगाव येथील रामेश्वर मंदिरात दर्शन घेतले व तेथे छत्रपती शिवाजी महाराजांनी लावलेल्या वटवृक्षाचे दर्शन घेतले. त्यानंतर आंगणेवाडी येथील मराठी देवीचे दर्शन घेतले.तसेच आचरा बीच रिसॅार्टवर एस.एम.हायस्कूलचे माजी विद्यार्थी आणि मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री.सुरेंद्र तावडे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने सुसंवाद साधला व जुन्या आठवणींना उजाळा दिला.सर्व माजी विद्यार्थीनींनी५०वर्षाचा आपला जीवनपट आपल्या मनोगताद्वारे व्यक्त केला.आशा ढेपसे हिने वेगवेगळया प्रकारचे खेळ करवून घेतले व आगळीच गमतीदार रंगत आणली.सुरेखा करंबेळकर व भरत तोरसकर यांनी यांनी गाणी म्हणून सर्वांच मंत्रमुग्ध केले.कवी डॉ.अनिल कांबळी व प्रज्ञा गोखले यांनी कविता सादर केल्या.शेवटी आडवली येथील स्वामी समर्थ मठात दर्शन घेऊन स्नेह मेळाव्याची सांगता झाली.स्नेह मेळावा यशस्वी करण्यासाठी संजय पाध्ये, नंदकिशोर आळवे, सतिश नाडकर्णी, प्रसाद देसाई, भरत तोरसकर यांनी विशेष मेहनत घेतली.

# विकासाच्या विश्वासाला तडा जाऊ देऊ नका, ८० टक्के समाजकारण करा !

## आ. अब्दुल सत्तार यांचे नवनिर्वाचित सदस्यांना आवाहन

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/ सिल्लोड :-** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत शिवसेनेच्या भगव्याचे वर्चस्व निर्माण करणाऱ्या नवनिर्वाचित सदस्यांचा भव्य सत्कार सोहळा सिल्लोड येथील शिवसेना भवन परिसरात उत्साहात पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना आमदार अब्दुल सत्तार यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले आणि "जनतेने विकासावर विश्वास ठेवून आपल्याला निवडून दिले आहे, त्यामुळे लोकांची सेवा करताना कोणतीही कसर सोडू नका," असे ठाम आवाहन केले.

आमदार सत्तार पुढे म्हणाले की, "आम्ही मतदारांकडे विकासाच्या मुद्द्यावर मते मागितली होती, त्यामुळे विकासासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. निवडून आलेल्या सदस्यांवर आता मोठी जबाबदारी आहे.



गावागावातील रस्त्यांची दुरुस्ती, शुद्ध पिण्याचे पाणी, शिक्षणाचा दर्जा सुधारणे, ग्रामीण आरोग्य सुविधा सक्षम करणे आणि महिला व युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे यावर ठोस नियोजन करून काम करा. शिवसेनेचे '८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण' हे ब्रीदवाक्य समोर ठेवून सामान्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्या." तसेच, आगामी काळात संघटनात्मक बांधणी करून महिला व युवकांची मजबूत फळी निर्माण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

याप्रसंगी नवनिर्वाचित जि .प. सदस्य अब्दुल आमेर यांनी आपल्या भाषणात विरोधकांचा तीव्र समाचार घेतला. ते म्हणाले की, "निवडणूक काळात विरोधकांनी जातीपातीचे राजकारण करण्याचा प्रयत्न केला, मात्र मतदारांनी विकासाला कौल दिला आहे. आमदार अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वाखाली आम्ही दिलेला शब्द पाळू आणि मतदारांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही."

या सोहळ्याला व्यासपीठावर नगराध्यक्ष अब्दुल समीर, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन गाढे, तालुकाप्रमुख केशवराव तायडे, माजी जि.प. अध्यक्ष श्रीराम महाजन, माजी सभापती राजेंद्र राठोड, कृउबा समितीचे सभापती विश्वास दाभाडे, उपसभापती संदीप राऊत, संचालक दामू अण्णा गव्हाणे, नंदकिशोर सहारे, राजाराम पाडळे, शेख जावेद, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, माजी उपनगराध्यक्ष विनोद मंडलेचा, शिवसेना जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच नवनिर्वाचित जि.प. सदस्य मंगलाताई तायडे, आशाबाई गाढे, देविदास पालोदकर, आयेशा सय्यद नासिर हुसेन, निकिता काळे आणि पंचायत समिती सदस्य जया ताठे, सुरेखा शिंदे, सोफिया शेख , रघुनाथ मोरे, रजनीताई नगरे, निजाम खान पठाण, रजिना बेगम अब्दुल समद, शेख सलीम भीकन, गयाबाई घोडे, सविता गव्हांडे यांच्यासह सयाजीराव वाघ, राजेंद्र ठोंबरे, दत्ता कुडके, डॉ. विठ्ठल जाधव, बापूराव काकडे व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोठूरे येथे बाणेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त भव्य यात्रोत्सव

**युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : प्रभू श्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि गोदावरीच्या पवित्र तीरावर वसलेल्या कोठूरे येथील प्राचीन व जागृत देवस्थान श्री बाणेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही पारंपरिक सप्ताह व यात्रोत्सव मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा करण्यात येत आहे. गावातील ग्रामस्थ, तरुण मित्र मंडळ, महिला मंडळ तसेच परिसरातील भक्तगण यांच्या सहकार्याने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महाशिवरात्रीच्या दिवशी पहाटे काकड आरतीने उत्सवाची सुरुवात झाली. त्यानंतर महाअभिषेक, रुद्रपाठ, लघुरुद्र, बिल्वपत्र अर्पण, हरिनाम सप्ताह, कीर्तन, भजन व प्रवचनांचे आयोजन करण्यात आले. दिवसभर भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी उसळली होती. निफाड तालुक्यासह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी बाणेश्वराचे दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला. मंदिर परिसरात आकर्षक रोषणाई व सजावट करण्यात आली असून भक्तिमय वातावरणाने संपूर्ण गाव न्हाऊन निघाले आहे.

ऐतिहासिक परंपरेने नटलेले कोठूरे

कोठूरे हे गाव ऐतिहासिक वारसा जपणारे म्हणून ओळखले जाते. गावातील दगडी बांधकामाचे भव्य वाडे, प्राचीन बारवा आणि नदीकाठची मंदिरे यांमुळे या नगरीला वेगळे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. 'कोठूरे' या नावाचा नेमका उगम स्पष्ट



नसला तरी निजामकालीन मुस्लिम सरदारांच्या वतनदारीत असतानाही गावाचे हेच नाव प्रचलित होते, असे इतिहास सांगतो.

कोकणातील गणपतीपुळे जवळील नेवरे गावचे वतनदार मल्हारराव बर्वे — जे बाजीराव पेशव्यांचे पणजोबा होते — छत्रपती शिवाजी महाराजांचे नातू छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात सिन्नर येथे दाखल झाले. त्यांना डुबेरे, पिंपळस, पांढुर्ली व कोठूरे ही गावे इनाम म्हणून मिळाली. गोदाकाठी वसलेले कोठूरे मल्हाररावांना विशेष भावले. त्यांनी गावची पाटीलकी विकत घेतली आणि गावची मुकादमीही बर्वे घराण्याकडे आली.

मल्हाररावांनी कोकणातून सुमारे ७० कुटुंबे कोठूरे येथे आणून स्थायिक केली. त्यांनी परिसरात हजाराच्या आसपास चिंचेची झाडे लावली. ही झाडे आजही त्या सुवर्णकाळाची साक्ष देत उभी आहेत. डुबेरे येथे त्यांनी भव्य वाडा बांधला, तर कोठूरे येथे गोदाकाठच्या बाणेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार करून नदीवर सात पटांगणांचा भव्य घाट उभारला.

बाणेश्वर मंदिराची धार्मिक व स्थापत्य वैशिष्ट्ये

श्री बाणेश्वर महादेवाचे शिवलिंग स्वयंभू मानले जाते. येथे प्रभू श्रीरामचंद्रांनी आगमन केल्याची आख्यायिका प्रचलित आहे. मंदिराची रचना शिवपंचायतन पद्धतीने करण्यात आलेली असून त्याची दगडी बांधणी आणि कलात्मक शिल्पकाम आकर्षक आहे. पूर्वी नर्मदा प्रदक्षिणेप्रमाणे गोदा प्रदक्षिणाही केली जात असे, म्हणून येथे दोन धर्मशाळा बांधण्यात आल्या आहेत.

मंदिरासमोर योगीराज यशवंत महाराजांचे मंदिर असून तेथे तीन दगडी दीपमाळा उभ्या आहेत. तसेच सन १९४८ मध्ये छत्रपती शिवरायांच्या मंदिराची स्थापना येथे करण्यात आली. त्यामुळे छत्रपती शिवरायांचा ऐतिहासिक वारसा या नगरीला लाभलेला आहे.

यात्रोत्सवामुळे गावात चैतन्य

महाशिवरात्रीनिमित्त आयोजित सप्ताह आणि यात्रोत्सवामुळे कोठूरे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांच्या पुढाकाराने स्वच्छता, पाणीपुरवठा, वाहतूक नियंत्रण व सुरक्षेची योग्य व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांच्या सोयीसाठी दर्शन रांगा, महाप्रसाद व विश्रांतीची व्यवस्था करण्यात आली आहे.

सप्ताहादरम्यान विविध कीर्तनकार, प्रवचनकार आणि भजन मंडळांनी हजेरी लावून धार्मिक वातावरण अधिक भारावून टाकले. पारंपरिक पद्धतीने साजरा होणारा हा यात्रोत्सव केवळ धार्मिक कार्यक्रम नसून कोठूरेच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाची जपणूक करणारा महत्त्वपूर्ण सोहळा ठरत आहे.श्री बाणेश्वर महादेवाच्या यात्रोत्सवामुळे कोठूरे नगरीत भक्तिरसाची अविरत गंगा वाहताना दिसत आहे.

# वीर वाजेकर महाविद्यालयात वीर वाजेकर पुण्यतिथी व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ" संपन्न

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी :** रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे येथे "वीर वाजेकर पुण्यतिथी व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ" संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठककर, यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष 2025-26 नवीन शैक्षणिक धोरणाचे आव्हान करण्यासाठी व महाविद्यालयाचे सर्वांगीण विकासासाठी या वर्षात केलेल्या शैक्षणिक,सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्याविषयी सविस्तर माहिती दिली. महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी केलेल्या संशोधनावर प्रकाश टाकला.आजूबाजूच्या परिसरात महाविद्यालये नव्याने स्थापन झालेली असून सुद्धा आमच्या महाविद्यालयात मागील वर्षापेक्षा जवजवळ 5% विद्यार्थी संख्या वाढल्याचे नमूद करण्यात आले. महाविद्यालयाने टाकलेली कात,महाविद्यालयात होणारे नवनवीन उपक्रम,शाळा जोडणी उपक्रमात महाविद्यालय अग्रेसर आहे याचाही उल्लेख त्यांनी केला.

पी.जे.पाटील, संस्थापकीय चेअरमन वीर वाजेकर कॉलेज व उपाध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी आपल्या




मनोगतातून रयत शिक्षण संस्था आणि वीर वाजेकर यांच्या सोबत काम करतानाचे विविध अनुभव सांगितले. वीर वाजेकर महाविद्यालय,सुरू करीत असताना खूप कष्ट घ्यावे लागले केवळ तुमच्या पिढीला व तुमच्या पुढील पिढीला शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावीयासाठी त्यांच्या सोबत काम केलेल्या वाय. जे. कडू कमलाकर ठाकुर अ.ना. ठाकूर कृष्णा कडू काका कडू सहदेव मोकल दत्तू धर्मा पाटील इत्यादी सर्वांची आठवण केली. आज बदलत्या काळात तुम्ही बदलले पाहिजे.सध्याचा काळ प्रचंड वेगाने बदलत आहे,त्यामुळे तुम्हांला जर या युगात टिकायचे असेल तर त्या वेगाने पुढे जायला हवे,हे महाविद्यालय,तुमच्या प्रगती साठी आवश्यक ते सर्व उपलब्ध करेल. शिक्षणामुळे ज्ञान,कौशल्य, तंत्रज्ञान समाजभिमूख पिढी घडवली जात आहे,याबद्दल समाधान वाटते. कार्यक्रमाचे अध्यक्ष, मा.बाळाराम पाटील चेअरमन,रायगड विभाग, सल्लागार समिती,रयत शिक्षण संस्था,सातारा.यांनी आपल्या मनोगतातून वाजेकर साहेब आणि त्यांनी केलेली मेहनत यामुळेच आज हे महाविद्यालय उभे आहे. वाजेकर साहेबांनी रयतच्या वटवृक्षाची एक पारंबी येथे लावली.आज महाशिवरात्री असूनही वाजेकर साहेबांची पुण्यतिथी आज व्हावी कारण,वाजेकर साहेबांनी केलेले काम कदाचित कोणत्याही सणापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. वाजेकर शेठनी या परिसरात मिठागर कामगारांची संघटना उभी करून,लोकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. तसेच या महालण विभाग व संपूर्ण उरण परिसरात शिक्षणाची गंगा आणली, त्यांच्या नेतृत्वाखाली या विभागात शिक्षण सुरू झाली.आज हे महाविद्यालय जी प्रगती करीत आहे त्यात वाजेकर साहेबांचा वाटा हा खऱ्या अर्थाने सिंहाचा आहे,यात दुमत नाही. बाळाराम पाटील यांनी कर्मवीर,वाजेकर शेठ यांनी रुजविलेली मानवीमूल्ये आजच्या विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे व कर्मवीरांनीज्या पद्धतीने झिजून रयतेसाठी काम केले त्याची आठवण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.डॉ.श्रेया पाटील कार्याध्यक्षा यांनी महाविद्यालयाचा शैक्षणिक, सांस्कृतिक व एकूणच कार्याचा सविस्तर अहवाल मांडला. महाविद्यालयातील 13 प्राध्यापकाना संशोधन, पुस्तक लेखन प्रकारात विशेष सन्मानित करण्यात आले. प्रा.देवेंद्र कांबळे यांनी क्रीडा अहवाल वाचन केले. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. क्रीडा,सांस्कृतिक व कला क्षेत्रातील विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.डॉ.सुजाता पाटील यांनी सांस्कृतिक विभागाचा अहवाल वाचन केले. महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे डीप फ्रीज व प्राणिशास्त्राच्या माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास एक फ्रिज तीन पंखे व 40 भिंतीवरची घड्याळे भेट म्हणून दिली. कार्यक्रमास मा.कृष्णाजी कडू, चेअरमन तू. ह. वाजेकर हायस्कूल, मा.सुधीर घरत सदस्य महाविद्यालय विकास समिती,मा.बी.बी.साळुंखे,

परेश ठाकुर, संकेत घरत, कुणाल पाटील, विजय भोईर श्रीमती काशीबाई ठाकूर , नितीन कमलाकर ठाकूर यशवंत ठाकू,सुरेश म्हात्रे, दर्शन घरत, प्रभाकर पाटील,रवी वाजेकर, वसंत तांडेल, श्री राजेश ठाकूर, केशव कडू, श्रीमती शैला पाटील तसेच महालण विभागातील विविध प्रतिष्ठीत उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सुजाता पाटील प्रा प्रांजल भोईर व प्रा.योगेश कुलकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन सदानंद म्हात्रे यांनी केले

# श्री संत साईबाबा प्राथमिक विद्यालयात माजी विद्यार्थी संघाची स्थापना

## शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थी एकत्र; कार्यकारिणी जाहीर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (प्रतिनिधी)** : श्री संत साईबाबा प्राथमिक विद्यालय येथे दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी माजी विद्यार्थी संघाची अधिकृत स्थापना करण्यात आली. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेच्या भौतिक व रचनात्मक विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा एकमुखाने मनोदय व्यक्त केला.आपल्याला घडवणाऱ्या मातृसंस्थेच्या प्रगतीसाठी एकत्रितपणे कार्य करण्याच्या उद्देशाने संघ स्थापन करण्यात आला असून शाळेच्या शैक्षणिक,सामाजिक व पायाभूत विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संघाची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली अध्यक्षपदी हर्षाली परब, उपाध्यक्षपदी मानसी पाथरवट, सचिव (पदसिद्ध) म्हणून मुख्याध्यापक वामन खैरनार, कोषाध्यक्षपदी श्वेतांबरा भोसले तसेच सह कोषाध्यक्षपदी



तुषार देशपांडे.

कार्यकारिणी सदस्य म्हणून सिद्धेश पाटील, विनोद वाघमारे, तेजस म्हात्रे, सागर महामुनी, स्नेहल भोईर, अमित रोकडे, डॉ. कुमार शिंदे, आस्वाद पाटील आणि श्रीकांत म्हात्रे यांची निवड करण्यात आली. सल्लागार सदस्य म्हणून वैशाली पाटील, नवनीत गावंड, देविदास गायकवाड, जे. के. कुंभार, सुनील भुजबळ आणि सुरेश जाधव यांची निवड करण्यात आली.यावेळी बोलताना अध्यक्ष हर्षाली विजय परब म्हणाल्या,“आपल्याला घडवणाऱ्या शाळेसाठी काहीतरी करण्याची ही योग्य वेळ आहे. माजी विद्यार्थी संघाच्या माध्यमातून शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने कार्य करू.”

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक वामन शंकर खैरनार यांनी सांगितले की, “माजी विद्यार्थी संघ ही शाळेची मोठी ताकद आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, शैक्षणिक सहाय्य आणि पायाभूत सुविधा उभारणीत हा संघ महत्त्वाची भूमिका बजावेल, असा मला विश्वास आहे.”संघाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन उपक्रम, शैक्षणिक सहाय्य तसेच शाळेच्या विकासासाठी आवश्यक त्या योजना राबविण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी संघाच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदविण्याची ग्वाही दिली. बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

# निष्कलंक चारित्र्याचे, अजातशत्रू व्यक्तिमत्व ; आर आर पाटील



राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील उर्फ आर आर पाटील यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १६ फेब्रुवारी २०१५ रोजी आर आर पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले होते. आर आर पाटील यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते. राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच त्यांना सर्वसामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत. १६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबी चे ही शिक्षण घेतले. कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण वसंत दादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारणात बस्तान बसवले. १९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे एकवीस वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या. १९९५ साली आबा दुसऱ्यांदा आमदार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले. शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू साथीदार अशी त्यांची ओळख बनली. त्यांनीही राष्ट्रवादी घराघरात पोहचवण्यासाठी जीवाचे रान केले. ते काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे अध्यक्ष होते. राज्य मंत्रिमंडळात त्यांना अनेक महत्वाची पदे मिळाली. आर आर पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. गृहमंत्री असताना त्यांनी राज्यातील डान्स बार बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. डान्स बार बंद करण्याचा त्यांच्या निर्णयाला कडाडून विरोध झाला पण ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले. गृहमंत्री असतानाच त्यांनी महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान राबवले. गृहमंत्री असताना त्यांनी खाजगी सावकारी विरूध्दही दंड थोपटले होते तसेच त्यांनी गुटखा बंदी करण्याचा देखील निर्णय घेतला होता. त्यांच्या याच धडाकेबाज निर्णयांनी त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी पदे भूषवूनही आबांनी तळागळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद तुटू दिला नाही. सत्ता येते आणि जाते जोडलेले माणसे टिकवली पाहिजेत हे आबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. उच्च पदावर पोहचूनही आबांनी आपला साधेपणा कायम ठेवला. इतक्या मोठ्या पदावर असतानाही आबांनी आपल्या पाल्यांना महागड्या इंग्रजी शाळेत न घालता जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत घातले होते. आबांसारखे तळागळातून आलेले स्वच्छ चारित्र्याचे निष्कलंक, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळच. सध्याच्या गढूळ राजकीय वातावरणात तर आबांसारख्या निष्कलंक चारित्र्याच्या नेत्याची आवर्जून आठवून येते. राजकारणात त्यांनी जो आदर्श घालून दिला आहे त्याचे अनुकरण आजच्या राजकीय नेत्यांनी केले तरच राजकीय नेत्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा प्राप्त होईल. आबांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार

## सिल्लोड तालुका वकील संघाच्या शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी ॲड. शेख उस्मान तर सचिवपदी ॲड. अनिल लोखंडे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** सिल्लोड तालुका वकील संघाच्या सभागृहामध्ये दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी शिवजयंती उत्सवाच्या नियोजनासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अशोक दादा तायडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि सचिव ॲड. हमीद खान यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत सन २०२६ च्या शिवजयंती उत्सव समितीची नवीन कार्यकारिणी सर्वानुमते घोषित करण्यात आली. यामध्ये समितीच्या अध्यक्षपदी ॲड. शेख शे. उस्मान शे. ताहेर यांची, तर सचिवपदी ॲड. अनिल लोखंडे यांची निवड करण्यात आली आहे.





या नवनियुक्त कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष म्हणून ॲड. इरफान पठाण, सहसचिव म्हणून ॲड. विलास आर. महाजन व ॲड. के. एस. मोटे यांची निवड झाली. कोषाध्यक्षपदाची जबाबदारी ॲड. जी. टी. साखरे यांच्याकडे सोपवण्यात आली असून, त्यांना सहकोषाध्यक्ष म्हणून ॲड. बी. के. दांडगे सहकार्य करतील. कार्याध्यक्षपदी ॲड. जी. व्ही. ढोणे, स्वागताध्यक्षपदी ॲड. एस. आर. काकडे, संघटक म्हणून ॲड. व्ही. आय. मंडलेचा, तर सहसंघटक म्हणून ॲड. इम्रान खान व ॲड. सय्यद रिजवान यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे या समितीत महिला वकिलांचा मोठा सहभाग असून महिला प्रतिनिधी म्हणून ॲड. निलोफर शेख उस्मान, ॲड. वैजयंती मंगेश पंडित, ॲड. रूपाली चाटे, ॲड. अनुराधा साळवे, ॲड. पूजा फुके व ॲड. पूजा काळे यांची निवड झाली आहे. समितीला मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. अशोक दादा तायडे तर प्रमुख सल्लागार म्हणून ॲड. संतोष झाल्टे, ॲड. हमीद खान आणि ॲड. डी. बी. जैवळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रसिद्धी प्रमुख म्हणून ॲड. जे. पी. मगर, ॲड. दीपक दांडगे, ॲड. नजीर तडवी व ॲड. अमोल लाठे काम पाहणार आहेत. सल्लागार समितीमध्ये ॲड. एन. ए. देशमुख, ॲड. के. एस. कळम, ॲड. एस. एस. दौड, ॲड. एस. जी. डावरे, ॲड. अनिस अहमद, ॲड. आर. टी. ताठे, ॲड. एस. डी. मंडलेचा, ॲड. एस. के. ढाकरे, ॲड. एस. जी. बोराडे व ॲड. धीरज गुप्ता यांचा समावेश आहे.

व्यवस्थापनाची जबाबदारी ॲड. एम. एस. पंडित, ॲड. प्रमोद राऊत, ॲड. एस. वाय. गुळवे, ॲड. विजय खंडाळकर व सहव्यवस्थापनासाठी ॲड. अंकुश गव्हाणे, ॲड. मनोज जैवळ, ॲड. गजानन जगनाडे, ॲड. निलेश काळे, ॲड. एम. एन. शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कार्यकारी सदस्य म्हणून ॲड. ए. एस. निकाळजे, ॲड. के. पी. चाथे, ॲड. लईक अहमद, ॲड. मिलिंद जाधव, ॲड. विशाल शेजुळ, ॲड. इम्तियाज अहमद, ॲड. विशाल सुरडकर, ॲड. के. पी. झलवार, ॲड. जी. एस. आरके, ॲड. सदाशिव बडक, ॲड. कैलास इंगळे व ॲड. आर. आर. सुरडकर यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. यावेळी वकील संघाचे सर्व पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## म्हात्रोळीत जमीन मोजणीवरून विधानसभा अध्यक्ष नार्वेकर व शेतकऱ्यांमध्ये तूफान भांडण ; ग्रामस्थांनी 'पळवा'लं !

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :'** रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील म्हात्रोळी गावात जमीन मोजणीवरून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर व स्थानिक शेतकऱ्यांमध्ये शुक्रवारी दुपारी तूफान बाचाबाची झाली. या वादाचा व्हिडीओ शनिवारी सकाळी सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने खळबळ उडाली असून, राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. शेतकऱ्यांनी नार्वेकर यांना तिथून 'पळवून लावलं' असा दावा ग्रामस्थ करत आहेत.मोजणीवरील तीव्र विरोधाने उडाली खळबळ म्हात्रोळी गावातील ग्रामस्थांच्या माहितीनुसार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे काही शासकीय कर्मचाऱ्यांसह जागेची मोजणी करण्यासाठी शेतावर पोहोचले होते. ही मोजणी रमेश पाटील या शेतकऱ्याच्या मालकीच्या शेतात सुरू होती. रमेश पाटील यांच्या कुटुंबात लग्न असल्याने ते अन्यत्र गेल्याने सुरुवातीला कोणताही विरोध नव्हता. मात्र, माहिती मिळताच रमेश पाटील व त्यांच्या कुटुंबीयांनी शेतावर धावत



**मी भांडण मिटवण्यासाठी गेलो होतो.माझा या घटनेशी काहीही संबंध नाही. मी तुमच्यात दोन लोक भांडताना पाहिले आणि त्यांना शांत करण्यासाठी तिथे गेलो. या प्रकरणाबद्दल कोण काय म्हणत आहे हे मला माहित नाही. पण जर कोणी माझ्यावर काही आरोप करत असेल तर ते सर्व निराधार आहेत.**

**राहुल नार्वेकर,**
**विधानसभा अध्यक्ष.**

आले. त्यांनी जमीन मोजणीस तीव्र विरोध दर्शवला आणि नार्वेकर व सोबतच्या शासकीय कर्मचाऱ्यांना तात्काळ निघून जाण्यास सांगितलं.प्रत्यक्षदर्शी ग्रामस्थांच्या सांगण्यानुसार, संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी नार्वेकर यांना समजावण्याचा प्रयत्न केला तरी ते ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हते. नार्वेकर यांनी शेतकऱ्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला, पण रमेश पाटील कुटुंबीयांनी त्यांना अक्षरशः तिथून हाकलून दिलं. अखेर विधानसभा अध्यक्षांनी कर्मचाऱ्यांसह काढता पाय घेतला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होताच गावात खळबळ उडाली.

"वादग्रस्त जमिनीचा पृष्ठभाग
"

ग्रामस्थांच्या मते, ही जमीन मोजणी दीर्घकाळापासून वादग्रस्त आहे. स्थानिक शेतकऱ्यांचा असा दावा आहे की, शासकीय यंत्रणेकडून त्यांच्या शेतीवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न होत आहे. रमेश पाटील यांनी यापूर्वीही अशा मोजण्या रोखल्या असल्याचे ग्रामस्थ सांगतात. विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांच्या या अचानक भेटीमुळे राजकीय षडयंत्र असल्याचे स्थानिक नेते म्हणत आहेत.

"मात्र राजकीय वर्तुळात चर्चेची ठिणगी "

रायगड जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात ही घटना चर्चेचा विषय ठरली आहे. विधानसभा अध्यक्ष असलेल्या नार्वेकर यांना स्थानिक शेतकऱ्यांकडून असा विरोध होणं ही आश्चर्याची बाब असल्याचे नेते सांगत आहेत. विरोधकांनी याला 'शेतकऱ्यांवरील जुलूम' म्हणून चित्रित केलं असून, भाजप नेत्यांकडून मात्र याला 'व्यक्तिगत वाद' म्हणून हाताळण्याचा प्रयत्न सुरू आहे. या घटनेमुळे म्हात्रोळी गावात तणाव वाढला असून, ग्रामस्थांनी पुढील मोजणीसाठी 'पूर्ण निषेध' जाहीर केला आहे. ग्रामस्थांनी घटनास्थळी पोलिस बोलावण्याची मागणी केली असली तरी अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. या वादाचा पुढील विनियोग राजकीय पक्ष कसा करणार, याकडे लक्ष लागलं आहे.

# कंटाळा टाळा, आयुष्य जगा! - मनीषा रेगे, मुंबई

"मला खूप कंटाळा आलाय," हे वाक्य आपण दिवसातून कितीदा ऐकतो किंवा स्वतःशीच म्हणतो? आजच्या धावपळीच्या जगात, हातात स्मार्टफोन असूनही आपल्याला रिकामं वाटतं. पण खरंच, कंटाळा येणं टाळता येऊ शकतं का? उत्तर आहे - नक्कीच! कंटाळा हा वेळेचा अभाव नसून, कुतूहलाचा अभाव आहे.

सतत उत्साही राहण्यासाठी पहिली गुरुकिल्ली म्हणजे 'नवीन काहीतरी शिकणे'. जेव्हा आपण शिकणे थांबवतो, तेव्हा मन साचलेल्या पाण्यासारखे होते. मग ती एखादी नवीन भाषा असो, स्वयंपाकाची नवीन रेसिपी (उदा. गोव्याची खास शैली) असो किंवा एखादं वाद्य वाजवणं. वयाच्या ५० व्या वर्षी सुद्धा एखादी नवीन गोष्ट शिकताना मेंदूला जे आव्हान मिळते, त्यामुळे कंटाळा कोसो दूर पळतो.

दुसरा उपाय म्हणजे 'कामात वैविध्य आणणे'. जर तुम्हाला तुमच्या रोजच्या रुटीनचा कंटाळा आला असेल, तर त्यात छोटे बदल करा. रोजच्या रस्त्याऐवजी वेगळ्या रस्त्याने जा, सकाळी उठल्यावर आधी व्यायाम करा किंवा वाचन करा. जेव्हा मेंदूला अनपेक्षित गोष्टी मिळतात, तेव्हा तो अधिक सतर्क होतो.

तिसरी आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'डिजिटल जगातून ब्रेक'. आजकाल आपण स्क्रोलिंग करण्यात तासनतास वाया घालवतो, ज्यामुळे मेंदूला थकवा येतो आणि नंतर कंटाळा जाणवतो. त्याऐवजी निसर्गाच्या सानिध्यात जा, बागेत काम करा किंवा जुन्या मित्रांशी गप्पा मारा. माणसांशी आणि निसर्गाशी असलेला संवाद आपल्याला आतून आनंदी ठेवतो.

सर्वात शेवटी, 'स्वतःला आव्हान देणे'. एखादे ध्येय ठरवा - मग ते सात वर्षांनी निवृत्त होण्याचे नियोजन असो किंवा एखादे पुस्तक लिहिण्याचे. जेव्हा आयुष्याला एक दिशा असते, तेव्हा प्रत्येक दिवस एक पायरी वाटतो आणि प्रवासाचा आनंद मिळतो.

कंटाळा ही एक मानसिक अवस्था आहे. जर तुम्ही तुमच्या मनाला सतत 'का?' आणि 'कसे?' हे प्रश्न विचारत राहिलात, तर तुम्हाला उत्तरं शोधण्यातच इतका रस वाटेल की कंटाळा करायला वेळच मिळणार नाही!

पत्रकारांसाठी (Journalists) 'डिजिटल ब्रेक' घेणे हे इतर क्षेत्रांतील लोकांपेक्षा जास्त कठीण असते, कारण 'बातम्या कधीही थांबत नाहीत'. पण सततच्या ब्रेकिंग न्यूजच्या तणावामुळे 'बर्नआउट' (Burnout) होण्याचा धोकाही पत्रकारांनाच जास्त असतो.

पत्रकार म्हणून तुम्ही डिजिटल ब्रेक कसा घेऊ शकता, यावर ३०० शब्दांचा विशेष लेख खालीलप्रमाणे आहे:

ब्रेकिंग न्यूजच्या युगात पत्रकारांनी 'डिजिटल ब्रेक' कसा घ्यावा?

पत्रकारितेत एक म्हण आहे, "बातम्या कधीच झोपत नाहीत." पण बातमी देणाऱ्या पत्रकाराला मात्र झोपेची आणि विश्रांतीची नितांत गरज असते. सततचे अपडेट्स, डेडलाईन्स आणि सोशल मीडियाचे नोटिफिकेशन यामुळे पत्रकारांचे मानसिक आरोग्य धोक्यात येत आहे. माहितीच्या या महापुरात न बुडता, स्वतःला 'रिचार्ज' करण्यासाठी डिजिटल ब्रेक घेणे आता अपरिहार्य झाले आहे.

पत्रकारांसाठी डिजिटल ब्रेक का अवघड आहे?

सामान्य माणूस फोन बंद करू शकतो, पण पत्रकाराला भीती असते की, "माझा फोन बंद असताना एखादी मोठी बातमी आली तर?" ही 'FOMO' (Fear of Missing Out) ची भीतीच पत्रकारांना स्क्रीनपासून दूर जाऊ देत नाही.

डिजिटल ब्रेक घेण्याचे स्मार्ट उपाय:

१. 'व्हीआयपी' (VIP) फिल्टर वापरा:

तुम्ही पूर्णपणे फोन बंद करू शकत नसाल , तर तो 'Do Not Disturb' (DND) मोडवर ठेवा. फक्त तुमचे संपादक आणि अत्यंत महत्त्वाचे सोर्सेस (Sources) यांचेच कॉल वाजतील असे सेटिंग करा. यामुळे अनावश्यक ग्रुप चॅट्स आणि सोशल मीडियाच्या आवाजापासून सुटका मिळेल.

२. बातम्यांचे सेवन (Consumption) मर्यादित करा:

कामाच्या वेळेत बातम्या बघणे ठीक आहे, पण घरी गेल्यावरही टीव्हीवर न्यूज चॅनल बघणे किंवा ट्विटर (X) स्क्रोल करणे टाळा. ऑफ-ड्युटी असताना बातम्यांचा 'ग्राहक' बनू नका.

३. ऑफलाईन 'बीट' (Beat) नेटवर्किंग:

प्रत्येक वेळी व्हॉट्सॲपवर माहिती घेण्यापेक्षा, तुमच्या सोर्सेसना प्रत्यक्ष भेटा. चहाच्या टपरीवर किंवा ऑफिसात समोरासमोर बोलताना फोन खिशात ठेवा. यामुळे 'नेटवर्किंग'ही होईल आणि डोळ्यांना स्क्रीनपासून आरामही मिळेल.

४. 'नो-स्क्रीन' झोप:

रात्री उशिरापर्यंत ब्रेकिंग न्यूजची वाट पाहणे बंद करा. झोपण्यापूर्वी किमान ३० मिनिटे आधी फोन बेडपासून दूर ठेवा. चांगल्या झोपेमुळेच दुसऱ्या दिवशी तुम्ही ताज्या तवाण्या मनाने नवीन स्टोरी करू शकाल.

५. माहिती उपवास (Info-Fasting):

आठवड्यातून किमान अर्धा दिवस (शक्यतो सुट्टीच्या दिवशी) पूर्णपणे डिजिटल जगातून बाहेर पडा. त्या दिवशी वर्तमानपत्रही वाचू नका. हा वेळ कुटुंब, व्यायाम किंवा वाचनासाठी द्या.

निष्कर्ष:

चांगली पत्रकारिता करण्यासाठी मन शांत असणे गरजेचे आहे. जर बॅटरीच संपली असेल, तर मोबाईल जसा काम करत नाही, तसेच पत्रकाराचे मन थकले असेल, तर लेखणीत धार येत नाही. त्यामुळे गिल्ट फ्री (Guilt-free) होऊन ब्रेक घ्या, कारण तुम्ही 'लॉग ऑफ' (Log off) केले तरी जग थांबणार नाही, पण तुम्ही थांबलात तर तुमची प्रकृती नक्कीच बिघडेल.

**मनीषा रेगे, मुंबई.+91 98339 16173 (लेखिका ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

